
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक ५२
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ ◆पाने ८ ◆ किंमत ₹ २

## दिवेआगरच्या समुद्रात बुडणाऱ्या तिघांना जीवदान



**श्रीवर्धन :** पुण्याहून पर्यटनासाठी आलेल्या तीन पर्यटकांना दिवेआगर येथील समुद्रात बुडताना स्थानिक तरुणांनी वेळीच धाव घेत जेट स्कीच्या मदतीने सुखरूप बाहेर काढले. आदित्य मिसे (२४), अभिषेक साळवे (२३) आणि भूमी बोऱ्हाडे (२१) हे समुद्रात पोहत असताना पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने खोल पाण्यात ओढले गेले. मोठ्या लाटांमुळे तिघेही बुडू लागल्याने काही काळ समुद्रकिनारी धावपळ उडाली. पोर्ट केबिन विसर्जन पॉईंटवर कर्तव्यावर असलेले होमगार्ड रेवाळे यांनी पर्यटकांचा मदतीसाठीचा आवाज ऐकताच बचावकार्यासाठी आवाहन केले. त्यानंतर दिवेआगर येथील गोविंदा मिरवणुकीत सहभागी असलेले प्रणय चोगले, विघ्नेश चोगले, योगेश चोगले, विष्णुदास चोगले यांच्यासह इतर ग्रामस्थ तातडीने मदतीसाठी धावले. जेट स्कीच्या सहाय्याने त्यांनी समुद्रात उतरून तिन्ही पर्यटकांना बाहेर काढले.

अंतरंग
मध्य रेल्वेकडून कोकणासाठी गणपती विशेष गाड्या/२
पत्नीला आणण्यासाठी निघालेल्या तरुणाचा मृत्यू/५
चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत सात्त्विक-चिरागला जेतेपद/८

# विविध समाज घटकांतील कार्यकर्ते भाजपमध्ये

## खोपोलीत कार्यक्रम : आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती



**खोपोली : प्रतिनिधी**

भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस तथा पनवेलचे कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून खोपोली येथील विविध समाजघटकांतील सुमारे २०० कार्यकर्त्यांनी 'कमळ' हाती घेतले. त्यांचे भाजपमध्ये स्वागत करण्यात आले.

भाजप खोपोली शहर आणि विक्रम साबळे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य दहीहंडी उत्सवाचे औचित्य साधून महाराजा मंगल कार्यालयाच्या प्रांगणात हा भव्य पक्षप्रवेश झाला. या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, युवा नेते नगरसेवक परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी सुमारे २०० कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यामध्ये ज्ञानेश्वर बनसोडे, अली शेख, मोहसिन शेख, रेहान शेख, सागर वाकुळे, तुफेल शेख, वेदांत मरागजे, राहुल गोचायत, गोरक्ष पवार, हर्ष पाटोळे, साहिल जांभळे, तुषार पाटोळे, मंथन शिंदे, प्रशांत सूर्यवंशी, कमरान शेख, केतन पाटोळे, नितील शर्मा, निलेश यादव, निरजालू राजपूत, मनीष कुमार, सलमान काझी, पल्लवी लोंढे, शाहीद शेख, सोनिया सुर्वे, मोईन शेख, आरती मिश्रा, सोनिया कांबळे, आदित्य पवार, अलका झा, सुफियान शेख, राज पवार, अरसलान शेख, फैज शेख, दस्तगीर शेख, हमजा शेख, शाहीद बागवान, अरमान शेख, दिलशाद शेख, अक्लू शेख, जुबेर शेख, सूर्यकुमार यादव, **(पान २ वर..)**

# राज्यात भरती परीक्षेतील गैरप्रकारांना बसणार चाप

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या भरती परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित, विश्वासार्ह, निष्पक्ष आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी विद्यमान परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचविण्याकरिता उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय जारी केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १२ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत राज्यातील भरती परीक्षा पद्धतीचे संपूर्ण पुनर्विलोकन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

समितीमध्ये पोलीस महासंचालक सदानंद दाते, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, संघ लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य एअर मार्शल अजित शंकरराव भोसले (सेवानिवृत्त) आणि भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी), मुंबई येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक श्यामप्रसाद करगड्डे यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी हे समितीचे सदस्य सचिव असतील.

राज्य शासनाचे विविध विभाग, प्राधिकरणे आणि परीक्षा घेणाऱ्या संस्थांकडून राबविण्यात येणाऱ्या भरती परीक्षांच्या विद्यमान प्रणाली व कार्यपद्धतीचा समिती आढावा घेईल. समिती राज्यातील प्रत्येक महसुली विभागाला भेट देऊन विद्यार्थी, उमेदवार, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी आणि अन्य संबंधित हितधारकांशी चर्चा व सल्लामसलत करेल. आवश्यकता भासल्यास इतर राज्यांतील उत्तम पद्धती तसेच अन्य देशांतील परीक्षा प्रणालींचाही अभ्यास केला जाईल. यानंतर समिती सर्वसमावेशक अंतिम अहवाल शासनास सादर करणार आहे.

**समिती करणार सुधारणा**

प्रश्नपत्रिका फुटणे, गोपनीयतेचा भंग, तोतया उमेदवार, संगनमत आणि प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर यांसारख्या अनुचित प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या यंत्रणेचा समिती आढावा घेईल. अशा गैरप्रकारांचा शोध घेणे, प्रतिबंधात्मक व पर्यवेक्षणात्मक उपाययोजना राबविणे आणि उत्तरदायित्व निश्चित करण्याबाबतही समितीकडून उपाय सुचविले जाणार आहेत.

# नवी मुंबईत सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकाची आत्महत्या

## वरिष्ठांवर आरोप; सुसाईड नोट, व्हिडीओ व्हायरल

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पोलीस दलाच्या विशेष शाखेतील सहाय्यक उपनिरीक्षक पी.एस. पाटील यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आत्महत्येपूर्वी त्यांनी एक व्हिडीओ तयार केला होता तसेच नऊ पानांची सविस्तर सुसाईड नोट लिहून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मानसिक त्रासाला कंटाळून हे टोकाचे पाऊल उचलत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पी.एस. पाटील हे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात सहाय्यक उपनिरीक्षक म्हणून सेवा बजावत होते. ते मूळचे रबाळे परिसरातील रहिवासी होते. त्यांनी गुरुवारी महापे येथील एका लॉजमध्ये



गळफास लावून आत्महत्या केली.

पाटील यांनी आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या नऊ पानांच्या सुसाईड नोटमध्ये पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. पोलीस उपायुक्त संजय कुमार पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त शिरीष ठाकरे आणि आस्थापना विभागाचे लिपिक (क्लर्क) जयू महिरे यांच्याकडून सतत होणाऱ्या मानसिक त्रासाला आणि जाचाला कंटाळून आपण हे पाऊल उचलत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

आत्महत्या करण्यापूर्वी पाटील यांनी सोशल मीडियावर एक व्हिडीओही शेअर केला होता. या व्हिडीओमध्ये त्यांनी वरिष्ठांकडून होणारा अन्याय आणि मानसिक छळ यावर तीव्र शब्दांत भाष्य केले होते. या आत्महत्या प्रकरणाची नोंद एनआरआय सागरी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दरम्यान, "व्हिडीओ आणि जप्त करण्यात आलेल्या आठ पानी चिठ्ठीसह उपलब्ध सर्व पुराव्यांची कसून पडताळणी करण्यात येत आहे. तपासातून समोर येणाऱ्या तथ्यांच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल," असे नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी म्हटले आहे.



**पनवेल : स्वराज्य सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा बाप्पा अर्थात मिरची गल्लीचा राजाचे रविवारी वाजतगाजत आगमन झाले.**

## निवडक

### दिल्लीत इमारत कोसळून दोघांचा मृत्यू, अनेक जखमी

**नवी दिल्ली :** दक्षिण दिल्लीच्या मोतीबाग परिसरातील सत्य निकेतन येथे रविवारी (दि.६) दुपारी दीडच्या सुमारास पाच मजली इमारत कोसळली. या दुर्घटनेत दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून काही विद्यार्थी आणि मजूर गंभीर जखमी झाले आहेत. घटनास्थळी पोलीस, अग्निशमन दल आणि एनडीआरएफची पथके युद्धपातळीवर बचावकार्य करीत असून ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना बाहेर काढण्याचे शर्थीचे प्रयत्न केले जात आहे.

### कळव्यात हिट अॅण्ड रन; महिलेचा मृत्यू, दोघे गंभीर

**ठाणे :** कळवा येथील खारीगाव परिसरातील एका सोसायटीच्या आवारात चारचाकी वाहनाने अनेकांना धडक दिल्याची धक्कादायक घटना रविवारी (दि.६) सकाळी घडली. या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला आहे. दोघे गंभीर, तर एक व्यक्ती किरकोळ जखमी झाली आहे. शुभांगी पाटील (४५) असे मृत झालेल्या महिलेचे नाव आहे, तर अभिषेक कदम (३१, कुर्ला) असे कारचालकाचे नाव आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेत चौकशी सुरू केली आहे.

# पनवेलमध्ये दहीहंडी उत्सवात गोविंदांना लागला विजेचा शॉक

## सर्वजण सुखरूप

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील लाईन आळी परिसरात दहीहंडी खेळत असताना चार ते पाच जणांना विजेचा शॉक लागल्याची घटना शनिवारी सायंकाळी घडली. सुदैवाने सर्वजण सुखरूप आहेत.

पनवेल शहरातील लाईन आळी परिसरात नवनाथ पंथीय आस्थानात दहीहंडी उत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. या दहीहंडीला शेकडो वर्षांची परंपरा असून अनेक पिढ्यांपासून ती साजरी केली जाते. दरवर्षीप्रमाणे हा दहीहंडी उत्सव साजरा होत असताना पाण्याच्या संपर्कामुळे विजेच्या लोखंडी खांबाला बांधलेल्या तारेत विद्युत प्रवाह उतरला आणि चार ते पाच जणांना शॉक लागला. यात एका मुलीचादेखील समावेश आहे.

यावेळी नागरिक आणि महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तेथील विद्युत पुरवठा बंद केला तसेच जखमींना तातडीने वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. जखमी सर्वजण सुस्थितीत आहेत. दरम्यान, पनवेल शहर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली.



# आमदार चषक दहीहंडी उत्सव जल्लोषात

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गोविंदा पथकांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पनवेल शहर आयोजित आमदार चषक दहीहंडी उत्सव शनिवारी मोठ्या दिमाखात झाला. उत्सव संस्कृतीचा, सोहळा परंपरेचा! हे ब्रीदवाक्य घेऊन पनवेल येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर या भव्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळयाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील आणि माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी भेट देऊन गोविंदा पथकांच्या धैर्याचे कौतुक केले. त्यांना पारितोषिके देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला आणि उत्साह वाढवला.



नगरसेवक तथा भाजप पनवेल शहराध्यक्ष सुमित उल्हास झुंजारराव यांच्या नेतृत्वाखाली व नियोजनाखाली हा सोहळा अतिशय शिस्तबद्ध व भव्य स्वरूपात पार पडला. उत्सवादरम्यान आलेल्या वरुणराजाच्या सरींमुळे गोविंदा पथकांचा उत्साह अधिकच द्विगुणित झाला होता.

या दहीहंडी उत्सवासाठी एकूण पाच लाख ५५ हजार ५५५ रुपयांची भरघोस पारितोषिके ठेवण्यात आली होती. गोविंदा पथकांसाठी थरांनुसार मानधन व बक्षीस जाहीर करण्यात आले होते; ज्यामध्ये पुरुषांसाठी सहा थरांसाठी पाच हजार रुपये, सात थरांसाठी १५ हजार रुपये आणि आठ थरांसाठी २५ हजार रुपये, तर महिला गोविंदा पथकांसाठी पाच थरांसाठी सात हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. हे रोख पारितोषिक व मानाचा आमदार चषक पटकावण्यासाठी अनेक पुरुष आणि महिला गोविंदा पथकांनी थरांवर थर रचत आपल्या जिद्दीचे व कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. या स्पर्धेत दुर्गामाता गोविंदा पथक, विचुंबे या पथकाला मानाची हंडी फोडण्याचा बहुमान मिळाला. **(पान २ वर..)**

# उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा!

## पनवेल मनपातर्फे शाडू मातीच्या गणेशमूर्ती निर्मितीची कार्यशाळा | लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा हा उपक्रम महापौर नितीन पाटील आणि आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत नुकतीच कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे पर्यावरणपूरक शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व, शाडू मातीच्या गणेशमूर्तींचे पर्यावरणीय फायदे तसेच गणेशोत्सवादरम्यान पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचा अनुभव घेतला. शाळेच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे उपस्थित होत्या.

यावेळी उपस्थितांनी माझी वसुंधरा प्रतिज्ञा घेत पर्यावरण संवर्धनाचा संकल्प केला. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांनी पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.



# अंतरवालीत ओबीसींचे लाक्षणिक उपोषण

**जालना : प्रतिनिधी**



अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या सुरू असलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर आता याच गावात ओबीसी समाजाकडून प्रतिआंदोलनाला सुरुवात झाली आहे. अॅड. मंगेश ससाणे आणि सहकाऱ्यांनी ओबीसींचे हक्क आणि अधिकार टिकवण्यासाठी लाक्षणिक उपोषण सुरू केले आहे.

अंतरवालीतील सोनियानगर येथे अॅड. मंगेश ससाणे, प्रा. विठ्ठल तळेकर, सतीश कुलाल, बाबासाहेब बटुळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रविवारी (दि.६) उपोषण सुरू केले. जरांगे यांच्या आंदोलनातून सरकारवर दबाव टाकला जात असल्याचा आरोप करीत ओबीसींचे हक्क व आरक्षण टिकवण्यासाठी हे आंदोलन असल्याचे ससाणे यांनी स्पष्ट केले. ओबीसी समाज आपल्या संविधानिक मागण्या उपोषणाच्या माध्यमातून मांडणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# वडाळे तलाव येथील कामांची पाहणी

## महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर यांनी घेतला आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून वडाळे तलाव येथे उभारण्यात येत असलेला गणेश विसर्जन घाट आणि भव्य प्रवेशद्वाराच्या कामाची महापौर नितीन पाटील आणि माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली तसेच संपूर्ण कामाचा सविस्तर आढावा घेतला.

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांसाठी विसर्जन व्यवस्था अधिक सुरक्षित, सुयोग्य आणि सुविधाजनक करण्याच्या दृष्टीने पालिकेकडून वडाळे तलाव येथे वेगाने काम सुरू आहे. या पाहणीदरम्यान विसर्जनादरम्यान होणारी गर्दी विचारात घेऊन नियोजनबद्ध सोयीसुविधा उपलब्ध करून देणे आणि सुरू असलेल्या सर्व कामांना गती देणे यावर विशेष चर्चा करण्यात आली.



पाहणीवेळी प्रभाग समिती 'ड'चे सभापती अजय बहिरा, नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेविका प्रीती जॉर्ज, रोटरी क्लबचे डॉ. गिरीश गुणे, संजय जैन, रूपेश नागवेकर, रोहित आठवणे यांच्यासह रोटरी सदस्य आणि महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. भाविकांना विसर्जन सोहळा निर्विघ्न आणि सुलभतेने पार पाडता यावा यासाठी सर्व कामे उच्च दर्जाची आणि वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

# तुकड्यातील जमिनींचे व्यवहार होणार नियमित! लाखो जमीनधारकांना मोठा दिलासा

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात तुकडेबंदी कायद्यामुळे अडचणीत सापडलेल्या लाखो जमीनधारकांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. २५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राच्या झालेल्या जुन्या जमीन व्यवहारांना ठरावीक अटींची पूर्तता केल्यानंतर नियमित करण्यास सरकारने हिरवा कंदील दाखवला आहे. यामुळे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी आकाराच्या जमिनींचे हस्तांतरण किंवा विभाजन झाल्यामुळे वर्षानुवर्षे रखडलेल्या फेरफार नोंदी आणि मालकी हक्काच्या नोंदींची प्रक्रिया आता पुन्हा वेगाने सुरू होणार आहे.

'महाराष्ट्र धारण जमीन तुकडे पाडण्यास प्रतिबंध व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबतच्या अधिनियमा'तील तरतुदींमुळे यापूर्वी अनेक ठिकाणी नियमापेक्षा कमी क्षेत्राच्या जमिनींची खरेदी–विक्री अडचणीत आली होती. व्यवहार होऊनही कायद्यातील अडथळ्यांमुळे त्यांची अधिकृत नोंदणी किंवा महसूल दप्तरी फेरफार नोंद होत नव्हती. परिणामी, पैसे देऊन आणि खरेदीखत हातात असूनही नागरिकांच्या नावावर मालकी हक्काची सातबारा नोंद होऊ शकली नव्हती.

शासनाने नुकत्याच घेतलेल्या या निर्णयानुसार महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायती, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) व इतर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे, तसेच विशेष नियोजन प्राधिकरणांच्या अखत्यारीतील जमिनींचा यात समावेश करण्यात आला आहे.

याशिवाय महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना कायद्यानुसार अधिसूचित क्षेत्रांतील जमिनी आणि प्रारूप अथवा अंतिम प्रादेशिक योजनेत निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा अन्य अनुज्ञेय वापरासाठी निश्चित केलेल्या सर्व क्षेत्रांना या नव्या तरतुदी लागू राहतील.

नोंदणी बंद असल्याने अनेक नागरिकांनी केवळ अनोंदणीकृत दस्तऐवजांच्या आधारे जमिनींचे व्यवहार केले होते. अशा सर्व व्यवहारांना आता कायदेशीर चौकटीत आणण्याची संधी उपलब्ध झाली आहे. यासाठी संबंधित खरेदीदाराने आवश्यक कागदपत्रांसह अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. त्यानंतर महसूल विभागामार्फत कायद्यातील विहित प्रक्रियेनुसार दस्तऐवजांची नोंदणी आणि महसूल अभिलेखात सुधारणा करण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

ज्या प्रकरणांमध्ये यापूर्वी तुकड्याचा फेरफार मंजूर होऊनही खरेदीदाराचे नाव प्रत्यक्ष मालकी हक्काऐवजी चुकीच्या किंवा 'इतर हक्कात' नोंदवले गेले होते, त्या नोंदींची पुनर्तपासणी करून ३ नोव्हेंबर २०२५ च्या अध्यादेशातील सुधारणांनुसार खरेदीदाराचे नाव योग्य हक्कात नोंदविले जाईल.

ही संपूर्ण प्रक्रिया सुलभ आणि गतिमान व्हावी, यासाठी स्थानिक महसूल यंत्रणेवर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. २५ ऑक्टोबर २०२४ पूर्वी झालेल्या अशा सर्व तुकड्यांच्या व्यवहारांची माहिती संबंधित ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांनी तातडीने संकलित करून नोंदणी विभागाकडे पाठवायची आहे.

संबंधित कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर महसूल अधिकाऱ्यांना फेरफार नोंदणीची पुढील सर्व प्रक्रिया ऑनलाइन प्रणालीद्वारे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या निर्णयातील सर्वात महत्वाची व दिलासादायक बाब म्हणजे, एकदा का अशा तुकड्यातील जमिनीची रीतसर नोंदणी होऊन हक्क अभिलेखात मालकाचे नाव लागले, की त्यानंतर त्या जमिनीच्या पुढील पुनर्विक्री किंवा हस्तांतरणावर कोणताही कायदेशीर प्रतिबंध राहणार नाही. त्यामुळे कागदोपत्री मालकी असूनही प्रत्यक्ष हक्कांपासून वंचित राहिलेल्या राज्यातील सर्वसामान्य खरेदीदारांना मोठी आर्थिक सुरक्षितता लाभणार आहे, असे अपर जिल्हाधिकारी सचिन ढोले यांनी कळविले आहे.

## मध्य रेल्वे कोकणासाठी ३४ अतिरिक्त गणपती विशेष गाड्या चालवणार

**रोहा : प्रतिनिधी**

प्रवाशांच्या मागणीनुसार मध्य रेल्वे कोकणासाठी ३४ अतिरिक्त गणपती विशेष गाड्या चालवणार आहे.यामध्ये खालील गाड्यांचा समावेश आहे.लोकमान्य टिळक टर्मिनस आणि मडगाव दरम्यान ४ आरक्षित विशेष गाड्या तसेच पनवेल आणि चिपळूण दरम्यान ३० अनारक्षित मेमू सेवा चालविण्यात येणार आहे. याचा फायदा कोकणातील गणेश भक्तांना होणार आहे.

लोकमान्य टिळक टर्मिनस मडगाव लोकमान्य टिळक टर्मिनस विशेष गाड्या (४ सेवा) गाडी क्रमांक ०१००३ विशेष गाडी दिनांक १६.०९.२०२६ आणि दिनांक १९.०९.२०२६ रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सकाळी ०७.५० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री २३.४५ वाजता मडगाव येथे पोहोचेल. (२ सेवा) गाडी क्रमांक ०१००४ विशेष गाडी दिनांक १५.०९.२०२६ आणि दिनांक १८.०९.२०२६ रोजी मडगाव येथून सायंकाळी १६.०० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०६.०५ वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. (२ सेवा)

या गाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवि आणि करमळी हे थांबे देण्यात आले आहेत.

पनवेल चिपळूण पनवेल मेमू अनारक्षित विशेष गाड्या (३० सेवा) गाडी क्रमांक ०११५९ मेमू अनारक्षित विशेष गाडी दिनांक १०.०९.२०२६ ते दिनांक १४.०९.२०२६ आणि दिनांक १८.०९.२०२६ ते दिनांक २७.०९.२०२६ या कालावधीत पनवेल येथून दुपारी १५.२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री २२.२० वाजता चिपळूण येथे पोहोचेल. (१५ सेवा) गाडी क्रमांक ०११६० मेमू अनारक्षित विशेष गाडी दिनांक १०.०९.२०२६ ते दिनांक १४.०९.२०२६ आणि दिनांक १८.०९.२०२६ ते दिनांक २७.०९.२०२६ या कालावधीत चिपळूण येथून सकाळी ०९.०० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी दुपारी १४.३० वाजता पनवेल येथे पोहोचेल. (१५ सेवा) वरील मेमू सेवा दिनांक १५.०९.२०२६ ते दिनांक १७.०९.२०२६ या कालावधीत चालवल्या जाणार नाहीत.

पनवेल ते चिपळूण या गाडीला पेण, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, सापे वामणे, करंजडी, विन्हेरे, दिवाणखवटी, कळंबणी बुद्रुक, खेड आणि अंजनि हे थांबे देण्यात आले आहेत. गाडी क्रमांक ०१००३ साठीचे आरक्षण दिनांक ०८.०९.२०२६ रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू होईल. अनारक्षित डब्यांचे बुकिंग युटीएस प्रणालीद्वारे करता येईल.

## रायगड जिल्हा रोजगार मेळावा समन्वय समिती अध्यक्षपदी साईनाथ श्रीखंडे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या रोजगार मेळाव्यांचे अधिक प्रभावी नियोजन व समन्वय साधण्यासाठी रायगड जिल्हास्तरीय रोजगार मेळावा समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय, विभागस्तरीय तसेच जिल्हास्तरीय रोजगार मेळावा समन्वय समित्या स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यात जिल्हास्तरीय रोजगार मेळावा समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे.



या समितीच्या अध्यक्षपदी साईनाथ दत्तात्रेय श्रीखंडे यांची निवड करण्यात आली असून रोशन विष्णू चाफेकर, मयुरेश पंढरीनाथ नेतकर, विशाल विश्वास जोशी, चंद्रशेखर विष्णू पाटील आणि धनाजी रामभाऊ घरत यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील रोजगार मेळाव्यांचे नियोजन, विविध आस्थापनांशी समन्वय, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच युवकांना कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराच्या माध्यमातून जोडण्याच्या प्रक्रियेला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

रायगड जिल्ह्यात उद्योग, पर्यटन, सेवा आणि विविध व्यवसाय क्षेत्रांचा विस्तार होत असताना स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी या समितीची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून बेरोजगार युवक आणि रोजगार देणाऱ्या आस्थापनांमध्ये थेट संपर्क निर्माण करण्यासही मदत होणार आहे.

## पर्यावरणपूरक 'निपुण हंडी'ने नवघर शाळेत गोपाळकाला

**पाली : प्रतिनिधी**

गोपाळकाला निमित्ताने सुधागड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा नवघर येथे 'निपुण महाराष्ट्र' कार्यक्रमांतर्गत पर्यावरणपूरक निपुण हंडी उपक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला. पारंपरिक दहीहंडीला शैक्षणिक व पर्यावरणपूरक स्वरूप देत नवघर शाळेने यावर्षी अभिनव उपक्रम राबविला.



या निपुण हंडीमध्ये पाणी किंवा दही न वापरता लाह्या, चॉकलेट, पेन, पेन्सिल, खोडरबर यांसोबत निपुणपेटीअंतर्गत शैक्षणिक साहित्य ठेवण्यात आले. अक्षरे, अंक, प्राणी–पक्षी ओळख, शब्दकोडी, बेरीज–वजाबाकी तसेच विविध कृती व प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना खेळाच्या माध्यमातून वाचन, लेखन, संख्याज्ञान व विचारकौशल्याचा सराव करण्याची संधी मिळाली.

इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांनी प्राधान्याने या उपक्रमात सहभाग घेतला. त्यांच्यासोबत शाळेतील इतर विद्यार्थ्यांनीही हंडी तयार करणे, सजावट करणे व उपक्रमाच्या नियोजनात उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून निपुण हंडीला आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप दिल या उपक्रमात वर्गशिक्षिका रुपाली लेंडवे यांनी सहभाग घेतला. विषयशिक्षिका वृषाली गुरव व मुख्याध्यापक संगीता बैकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची तयारी करण्यात आली होती.

निपुण महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत पर्यावरणपूरक निपुण हंडीच्या माध्यमातून पाणीबचतीचा संदेश देतानाच विद्यार्थ्यांना खेळातून शिकण्याची संधी मिळते. अशा उपक्रमातून आनंददायी शिक्षणाला चालना मिळून निपुण विद्यार्थी घडण्यास निश्चितच मदत होईलअसे उपशिक्षक राजेंद्र अंबिके यांनी सांगीतले.

## खोपोलीत दहीहंडी उत्सवात मनोरंजनाची मेजवानी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी खोपोली शहर व विक्रम साबळे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य दहीहंडी उत्सव महाराजा मंगल कार्यालयाच्या प्रांगणात उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला आकर्षक विद्युत रोषणाई ,लावण्यवती किरण आणि रेश्मा मुंबईकर यांच्या बहारदार लावणी सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. उत्कर्ष निर्मित आर्केस्ट्राच्या माध्यमातून मराठी–हिंदी गाण्यांची सुरेल मैफल, धुमशान संगीत आणि मराठमोळ्या लावणींचा तडका यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.



गोविंदा पथकांच्या उत्साहाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रथम पारितोषिक म्हणून १ लाख ११ हजार १११ रुपये पारितोषिक संघर्ष दहीहंडी पथकांनी पटकावले तसेच सलामीवीरांसाठी विशेष पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. यामुळे विविध गोविंदा पथकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत उंच थर रचत उपस्थितांची मने जिंकली. सहभाग घेतलेला गोविंदा पथकांना रोख पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. ढोल–लेझीमच्या तालावर गोविंदांचा उत्साह आणि जल्लोष पाहायला मिळाला.

या भव्य–दिव्य कार्यक्रमाच्या आयोजनाला मार्गदर्शन व सहकार्य करणारे भाजप ज्येष्ठ नेते यशवंतशेठ साबळे आणि माजी नगरसेवक अविनाश तावडे यांनी उपस्थित मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, गोविंदा पथके, कलाकार, नागरिक तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे स्वागत करून आभार मानले.

कार्यक्रमास भाजप अल्पसंख्याक नेते हाजी अराफत शेख, नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर, उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, ओबीसी जिल्हाध्यक्ष राजेश भगत, विठ्ठल मोरे, अरीफ शेख, खोपोली शहराध्यक्ष अजय इंगुळकर, नगरसेवक तथा सभापती किशोर पाटील, नगरसेविका सानिया शेख, नगरसेविका प्रतीक्षा रेटरेकर, नगरसेविका अश्विनी अत्रे, जिल्हा पदाधिकारी संजय तन्ना, शहर सरचिटणीस विकास खुरपुडे, विनायक मांडपे यांच्यासह लोकप्रतिनिधी, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विविध राजकीय पक्षातील नेत्यांनी या दहीहंडी उत्सवास भेट देऊन शुभेच्छा दिल्या या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, प्रदेश अध्यक्ष डॉ सुनील पाटील अनेक मान्यवरांनी या दहीहंडी उत्सवात भेट देऊन गोविंदा पथकांचा उत्साह वाढविला.

## अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्यात हर्षवर्धन पवार जिल्ह्यात दुसरा

**तळा : प्रतिनिधी**

राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूर यांचे माध्यमातून जिल्हा अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्याचे आयोजन महाड येथे दर्दमन अब्दुल्ला मुकादम इंग्लीश स्कूल कांबळे येथे जिल्हा स्तरीय स्पर्धेत तळा तालुक्यातील कु.हर्षवर्धन पुनम धनंजय पवार यांने यश संपादन करून दुसरा क्रमांक पटकावला आहे.



ही स्पर्धा सादरीकरण, दृक साहित्य,लेखीचाचणी व तोंडी परीक्षा असे स्वरूप होते.हि स्पर्धा भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७ भवितव्य व आव्हाने या विषयावर या स्पर्धेत जिल्हा स्तरावर दोन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यामधे गो.म.वेदक विद्यालयाचा हर्षवर्धन पवार हा दुसरा क्रमांकांने आला असून विभाग स्तरावर त्याची निवड झाली असून त्याचे सर्वस्तरांतून कौतुक होत आहे.

हर्षवर्धन पवार हा नेहमीच अभ्यास पुढे असून इयत्ता ५ वी, इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.तसेच नवोदय विद्यालयासाठी निवड झाली होती.गणित विज्ञान ऑलंम्पियाड स्पर्धा परीक्षेत सुवर्णपदक मिळविले आहे.विज्ञान प्रदर्शनातही यशस्वी कामगिरी केली आहे.

पान १ वरुन

### विविध समाज घटकांतील कार्यकर्ते भाजपमध्ये

अंगद प्रसाद, चंदू भारद्वाज, शंभू उपाध्याय, तथी उपाध्याय, सौरभ चौधरी, भरत सिंह, दीपक पाठक, सर्वोदय तिवारी, सरोज झा, बबिता सौ, ऋषिकेश तिवारी, चंद्रशेखर सिंह, मंपूसिंह, अर्चना सिंह, श्रीकांत यादव, रचना सिंह, तेजप्रकाश रामो, संतोष शर्मा, सतीश सिर, प्रमोद मिश्रा, अनिल झा, प्रेम दुढाळे, आदित्य झेंडे, संस्कार यादव, सुमित सकाटे, परशुराम बनसोडे, आवैज शेख, सागर आरकेरी, हैदर शेख, सागर कांबळे, अहमद शहा, अप्पा बनसोडे, स्वप्नील शेडगे, तुषार पवार, आर्यन फाळे, राजकुमार ढाबी, प्रिन्स धडवाल, राजकुमार बनसोडे, रेहान शेख, लक्ष्मण कांबळे, मानस पोतदार, रितेश भालेराव, ओंकार गवाडे, ओम कुशवाहा, उत्तम साबळे, आदिल सय्यद, निखिल सांदल, शुभम मासोलकर, हुसेन पटेल, अफरोज मोमीन, शंकर कांबळे, लक्ष्मण मसाळीकेरे, अमन शेख, बाबू कांबळे, हबीब शेख, सोनू बिंगार्डिवे, तनवीर शेख, नंदू यादव, सार्थक पक्के, अक्षय आरकेरी, इरफान शेख, शोएब सय्यद, संजय सोलंकी यांच्यासह अनेकांचा समावेश होता.

याचबरोबर राजेश कुमार उपाध्याय, निधी उपाध्याय, सीमा उपाध्याय, अर्पित उपाध्याय, रणोवर उपाध्याय, राजावर उपाध्याय, पं. संजीत झा, अलका झा, केशर उपाध्याय, अरुण झिंड, मिनू सिंह आणि संजीव कुमार मिश्रा यांच्यासह अनेक मान्यवरांनी भाजपमध्ये प्रवेश करून पक्षाच्या संघटनात्मक वाटचालीला बळ दिले. या सर्वांचे मान्यवरांनी भाजप परिवारात स्वागत केले.

कार्यक्रमास भाजप अल्पसंख्याक नेते हाजी अराफत शेख, भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, ओबीसी जिल्हाध्यक्ष राजेश भगत, विठ्ठल मोरे, आरिफ शेख, ज्येष्ठ नेते यशवंत साबळे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, खोपोली शहराध्यक्ष अजय इंगुलकर, सभापती किशोर पाटील, नगरसेविका सानिया शेख, प्रतीक्षा रेटरेकर, अश्विनी अत्रे, माजी नगरसेवक अविनाश तायडे, जिल्हा पदाधिकारी संजय तन्ना, शहर सरचिटणीस विकास खुरपुडे, विनायक माडपे यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आमदार चषक दहीहंडी उत्सव जल्लोषात

या दहीहंडी उत्सवास भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक सुमित झुंजारराव, दशरथ म्हात्रे, नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, रूचिता लोंढे, शिवानी घरत, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजप शहर सरचिटणीस रूपेश नागवेकर, उपाध्यक्ष केदार भगत, अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चा अध्यक्ष हिमेश बहिरा यांच्यासह सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी तरुणाईचा अफाट उत्साह, गोविंदांचा जल्लोष आणि उपस्थितांच्या उदंड प्रतिसादाने संपूर्ण पनवेल शहर परिसर दुमदुमून गेल्याचे दिसून आले.

## नीलिमाताई डावखरे यांनी माणगाव तालुक्यात कार्यकर्त्यांशी साधला संवाद

**नागोठणे : बातमीदार**

कोकण पदवीधर मतदारसंघाचे भाजपचे आमदार निरंजन डावखरे यांच्या पत्नी तथा भाजप महिला नेत्या नीलिमाताई डावखरे यांचा माणगाव तालुका दौरा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे संपन्न झाला. या दौऱ्यात विविध विकासकामांचे उद्घाटन, शैक्षणिक संस्थांना भेटी तसेच पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यात आला.



या दौऱ्यादरम्यान मौजे सुरव तर्फे निजामपूर येथे गणेश विसर्जन घाट बांधकामाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर निजामपूर येथील जवाहर नवोदय विद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) तसेच येथील गं. रा. मेहता विद्यालयास भेट देऊन तेथील विविध विषयांची माहिती जाणून घेण्यात आली.

निजामपूर येथे मंडळ पदाधिकारी व कार्यकर्त्यांची संवाद बैठक घेण्यात आली. तसेच माणगाव नगरपंचायतीमध्ये ई–लायब्ररी संच व सोलर यंत्रणेचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी विविध विकासकामांबाबत पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवरांशी चर्चा करण्यात आली.

निजामपूर येथील आयटीआयला भेट देताना नीलिमाताई डावखरे यांनी विविध ट्रेडच्या प्रशिक्षणाची पाहणी केली. प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी तसेच प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेल्या इन्स्ट्रुमेंट्सची कमतरता याबाबत त्यांनी शिक्षक वर्गाशी चर्चा केली. विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण मिळावे आणि आवश्यक साधनसामग्रीअभावी त्यांच्या प्रशिक्षणात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

या दौऱ्यात भाजप शिक्षण सेल रोहा तालुका अध्यक्ष अशोक अहिरे, युवा मोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्यासह मंडळ अध्यक्ष, पदाधिकारी उपस्थित होते.

# उलवे नोडमध्ये दहीहंडीचा थरार





## विजेत्यांना पारितोषिके



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष उलवे नोड, भाजप महिला मोर्चा आणि भाजप युवा मोर्चाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला भव्य दहीहंडी उत्सव २०२६ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उलवे नोडमधील सेक्टर ९, खारकोपर तलावाच्या बाजूला या रंगतदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दहीहंडीची विधिवत पूजा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सलामी दिलेल्या गोविंदा पथकांना बक्षीस देऊन त्यांचा उत्साह वाढवला.

या रंगतदार स्पर्धेत मानाची महिला दहीहंडी फोडण्याचा बहुमान मार्लेश्वर गोविंदा पथक, चुनाभट्टी यांनी मिळवला, तर पुरुषांची मुख्य दहीहंडी सिद्धार्थनगर, मोरा या गोविंदा पथकाने फोडून विजयाची मोहर उमटवली. उत्सवात सहा लाख ६६ हजार ६६६ रुपयांची भरघोस पारितोषिके आणि आकर्षक ट्रॉफी ठेवण्यात आल्या होत्या. महिला गोविंदा पथकांसाठी खास आकर्षक दहीहंडीचे विशेष आयोजन करण्यात आल्यामुळे महिला पथकांनीही मोठ्या हिरिरीने सहभाग नोंदवत आपल्या कौशल्याचे आणि जिद्दीचे प्रदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान प्रवीण मोहकर प्रस्तुत संगीतमय ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित गोविंदा पथकांनी शिस्तबद्ध पद्धतीने, समन्वय आणि सहकार्य भावनेने सहा ते सात थरांचे मानवी मनोरे रचून उपस्थितांची मने जिंकली. गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत व उलवे नोड महिला मोर्चा अध्यक्षा ॲड. योगिता भगत यांच्या नियोजनाखाली सोहळा पार पडला.

सोहळ्याला भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, वाय. टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, शैलेश भगत, रतनशेठ भगत, निलेश खारकर, अनंता ठाकूर, सुहास भगत, जयवंत देशमुख, जितेंद्र म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, प्रकाश खोपकर, ॲड. रत्नदीप पाटील, प्रणय कडू, धीरज ओवळेकर, प्रणय कोळी, मनोज नाईक, उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष सुनील मोरया, सुजाता पाटील, मंजुळा कोळी, शिवानी रॉय यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. गोविंदांचा जल्लोष, संगीताचा ठेका आणि प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादाने संपूर्ण उलवे नोड परिसर दणाणून गेला होता.



**पनवेल : बोहरा समाजाचे धर्मगुरू डॉ. सय्यदना मुफद्दल सैफुद्दीन तस यांच्या मिलादनिमित्त मिलाद मिरवणुकीचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. अंजुमन-ए-नजमी व शबाबुल ईद-उझ-झहाबी यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील भाजपच्या तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयापासून मिरवणुकीला आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली. या मिरवणुकीत बोहरा समाजातील नागरिक, तरुण आणि लहान मुले पारंपरिक पोशाखात सहभागी झाले होते. यावेळी नगरसेवक सुमित झुंजारराव यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.**

# उलव्यात रंगला भव्य दहीहंडी उत्सव





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी आणि शिवसंघर्ष प्रतिष्ठान उलवे शहर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला दहीहंडी उत्सव २०२६ अत्यंत उत्साहपूर्ण आणि जल्लोषाच्या वातावरणात पार पडला. यंदाचे या उत्सवाचे आठवे वर्ष असून गोविंदा पथकांनी हजेरी लावून थरांवर थर रचत दहीहंडी फोडण्याचा थरारक आनंद लुटला. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित राहून गोविंदा पथकांना बक्षिसे वितरित करीत त्यांचा उत्साह द्विगुणित केला.

दहीहंडी उत्सवासाठी एकूण सात लाख ७७ हजार ७७७ रुपयांची भरघोस पारितोषिके ठेवण्यात आली होती, ज्यामध्ये प्रथम पारितोषिक एक लाख ११ हजार १११ रुपये इतके होते. हे भव्य प्रथम पारितोषिक पटकावण्यासाठी विविध गोविंदा पथकांमध्ये मोठी चुरस पाहायला मिळाली. भाजप आणि शिवसंघर्ष प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे सोहळा अतिशय शिस्तबद्ध व दिमाखदार पद्धतीने पार पडला.

सोहळ्याला जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, शैलेश भगत, आयोजक अखिलेश यादव, धीरज ओवळेकर यांसह अनेक मान्यवर, स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिसरातील नागरिक, महिला आणि तरुणांनी या भव्य उत्सवाचा भरभरून आनंद घेतला.



## गोपाळकाल्यानिमित्त भजनात रसिक मंत्रमुग्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर १९, मुर्बी गाव येथील श्री राधाकृष्ण मंदिरात आयोजित नऊ दिवसीय अखंड हरिनाम सप्ताहाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दररोज भजन-कीर्तनात ग्रामस्थ तल्लीन झाले. श्रावण पौर्णिमेपासून सुरू झालेला हा उत्सव गोपाळकाळा, दहीहंडीपर्यंत चालतो.

याचे व्यवस्थापन जनार्धन मंगल्या ठाकूर यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी गावदेवी प्रासादिक भजन मंडळ विश्वासबुवा ठाकूर यांची भजनसेवा पार पडली. मंडळाच्या सदस्यांनी टाळ, पखवाज, हार्मोनियमच्या साथीने भजन सादर केले. त्यांच्या मधुर वाणीने रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. वर्षानुवर्षे ठाकूर कुटुंबीयांच्या वतीने गोपाळकाला उत्सव आयोजित केला जातो. पंचक्रोशीतील ग्रामस्थ उत्सवात सहभागी होतात.



**पनवेल : शिवाजीनगर येथील भाजप युवा मोर्चाचे सागर ठाकूर आणि विराज ठाकूर यांनी दोन नवीन गाड्या खरेदी केल्या आहेत. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सागर ठाकूर आणि विराज ठाकूर यांचे अभिनंदन करून शुभेच्छा देत गाड्यांचे पूजन केले. यावेळी शशिकांत ठाकूर हेही उपस्थित होते.**

# नवीन पनवेलमध्ये दहीहंडीची धूम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अस्मिता कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळ आणि प्रियदर्शिनी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला भव्य दहीहंडी उत्सव २०२६ अत्यंत उत्साही आणि जल्लोषाच्या वातावरणात पार पडला. नवीन पनवेल येथील के. ए. बांठिया हायस्कूलच्या पटांगणावर या रंगतदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन गोविंदा पथकांचा उत्साह वाढवला.

या भव्य दहीहंडी उत्सवासाठी एकूण दोन लाख २२ हजार २२२ रुपयांची भरघोस पारितोषिके ठेवण्यात आली होती. दरम्यान, ही मानाची दहीहंडी फोडण्यासाठी आणि रोख पारितोषिक पटकावण्यासाठी विविध गोविंदा पथकांनी हजेरी लावून थरांवर थर रचत आपल्या कौशल्याचे आणि जिद्दीचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. गोविंदांच्या तुफान जल्लोषाने, संगीताच्या तालाने आणि प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका सुशिला घरत आणि नगरसेविका डॉ. अस्मिता घरत यांच्या उत्कृष्ट नियोजनाखाली सोहळा अत्यंत दिमाखदार पद्धतीने संपन्न झाला. यावेळी ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, पनवेल महापालिकेचे सभागृहनेते प्रकाश बिनेदार, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक मनोज भुजबळ, दशरथ म्हात्रे, नगरसेविका श्वेता बहिरा, शिवानी घरत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सुनील घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, जगदीश घरत, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, विजय म्हात्रे, तेजस भुजबळ यांच्यासह अनेक राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अश्विनी बिंद्रे हत्याकांड; १० वर्षांनंतर मृत्यू दाखला सुपूर्द

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

२०१६मधील गाजलेल्या अश्विनी बिंद्रे हत्याकांडातील मृत अश्विनी बिंद्रे उर्फ अश्विनी राजू गोरे यांच्या मृत्यू दाखल्यासाठी सुरू असलेला नऊ वर्षांचा संघर्ष अखेर संपला आहे. ४ सप्टेंबर रोजी पनवेल महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी अश्विनी यांचे पती राजीव गोरे यांना मृत्यू प्रमाणपत्र सुपूर्द केले.

पनवेल महापालिका प्रभाग समिती ब ने जारी केलेल्या या मृत्यू दाखल्यानुसार अश्विनी राजू गोरे (३७) यांचे निधन ११ एप्रिल २०१६ रोजी झाले असल्याची नोंद करण्यात आली आहे. हे प्रमाणपत्र ४ सप्टेंबर रोजी जारी करण्यात आले आहे. यावर उपनिबंधक (जन्म आणि मृत्यू) उषा सुभाष राठोड यांची स्वाक्षरी आहे.

११ एप्रिल २०१६ रोजी अश्विनी बिंद्रे यांची हत्या झाली होती. २९ एप्रिल २०२५ रोजी न्यायालयाने आरोपींना शिक्षा सुनावली. अश्विनी यांच्या मृत्यूची अधिकृत नोंद पनवेल पालिकेच्या जन्म-मृत्यू रजिस्टरमध्ये झाली नव्हती. तहसीलदारांनी ३१ जुलै २०२६ रोजी मृत्यूची नोंद घेऊन दाखला देण्याचे आदेश दिले होते.

अखेर गोरे यांनी पालिकेकडे ५०० पानांची कागदपत्रे, न्यायालयीन निकालाच्या प्रती व तहसीलदारांचा आदेश सादर केला. याबाबत पालिका उपायुक्त अभिषेक पराडकर म्हणाले होते की, दाखला देण्यास टाळाटाळ झाली नाही. योग्य प्रक्रिया पूर्ण करून दाखला देण्यात येईल. त्यानुसार दाखला देण्यात आला.

मृत्यू दाखला नसल्याने अश्विनी यांची मुलगी सुची हिला शासनाच्या योजना तसेच अनुकंपा तत्त्वावरील लाभ मिळण्यात अडथळे येत होते. अखेर दाखला मिळाल्याने राजीव गोरे यांनी पनवेल पालिका प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत.



**पनवेल : साई प्रसाद गार्डन फेज २, नेवाळी येथे पारंपरिक दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. संस्कृती आणि परंपरेची जपणूक करीत सोसायटीतील रहिवाशांनी मोठ्या उत्साहाने या उत्सवात सहभाग घेतला.**

# गणेशोत्सवात अवाजवी भाडे आकारल्यास होणार कारवाई; आरटीओचा इशारा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबईसह विविध भागांतून कोकणात दाखल होणाऱ्या लाखो भाविकांचा प्रवास सुरक्षित, सुखकर आणि विनाअडथळा व्हावा यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेलमार्फत आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

गणेशोत्सवाच्या कालावधीत प्रवाशांची गैरसोय, लूटमार, अवाजवी भाडे आकारणी तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालक व मालकांविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेलमार्फत देण्यात आला आहे. गणेशोत्सव काळात मोठ्या संख्येने प्रवासी रेल्वे स्थानक, बसस्थानके तसेच प्रमुख वाहतूक केंद्रांवर दाखल होणार असल्याने रिक्षा व प्रवासी बस वाहतूकदारांनी प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. रिक्षा चालकांनी वाहनाची सर्व आवश्यक कागदपत्रे वैध ठेवणे बंधनकारक असून, रेल्वे स्थानक तसेच महत्त्वाच्या थांब्यांवर वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, अशा शिस्तबद्ध पद्धतीने रिक्षा उभ्या कराव्यात.

प्रवाशांकडून शासनाने अथवा परिवहन विभागाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अवाजवी भाडे आकारू नये, तसेच प्रवाशांशी उद्धटपणे वर्तन करू नये. रिक्षाची प्रवासी क्षमता लक्षात घेऊनच प्रवाशांची वाहतूक करावी. क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक करून प्रवाशांच्या सुरक्षिततेशी तडजोड करू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. खासगी तसेच प्रवासी बस चालक आणि मालकांनीही गणेशोत्सवाच्या काळात विशेष दक्षता घ्यावी. बसमधील आपत्कालीन खिडकी किंवा दरवाजा, अग्निशामक यंत्रणा आणि प्रथमोपचार पेटी सुस्थितीत व वापरण्यायोग्य असणे आवश्यक आहे. चालकाने मद्यपान करून किंवा धोकादायक पद्धतीने वाहन चालवू नये. अशा प्रकारचे नियमभंग आढळल्यास संबंधित चालकासह बस मालकाविरुद्ध मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत असलेल्या तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल.

गणेशोत्सव काळात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रवासी बसच्या फेऱ्या आणि सुटण्याच्या वेळांचे योग्य नियोजन करावे. परिवहन विभागाने निश्चित केलेल्या भाडेदरांपेक्षा अधिक भाडे प्रवाशांकडून आकारू नये. प्रवाशांची संख्या वाढल्यामुळे त्याचा गैरफायदा घेऊन जादा भाडे आकारणाऱ्या वाहतूकदारांवरही कारवाई केली जाणार आहे. रिक्षा किंवा बस वाहतूकदारांकडून जादा भाडे आकारले जात असल्यास, प्रवाशांशी गैरवर्तन होत असल्यास अथवा वाहतूक नियमांचे उल्लंघन आढळल्यास प्रवाशांनी संबंधित वाहनाचा क्रमांक, प्रवासाचा मार्ग व तक्रारीचा तपशील नमूद करून प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेलच्या अधिकृत ई-मेलवर rto.४६-mh@gov.in तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संपादकीय

# मानवतेचा संवाद

**जागतिक प्रगतीची व्याख्या केवळ आर्थिक निकषांवर करणे अपुरे असून शाश्वत जागतिक शांततेसाठी मानवी मूल्यांची जपणूक आणि सांस्कृतिक संवाद ही काळाची गरज बनली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुसऱ्या ग्लोबल इम्पॅक्ट फोरममध्ये याच उदात्त आणि सकारात्मक विचारांना नवसंजीवनी दिली असून ते मानवी संस्कृतीच्या शाश्वत विकासाचा मार्ग अधोरेखित करते.**

**आजचे जग हे तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणामुळे एकमेकांशी जोडलेले असले, तरी त्यातील संवाद हा बहुतांश वेळा केवळ आर्थिक देवाणघेवाण, व्यापारी करार आणि नफेखोरीपुरता मर्यादित राहिला आहे. अशा भौतिकवादी युगात, केवळ आर्थिक हितसंबंधांच्या पलीकडे जाऊन मानवी मूल्ये आणि सांस्कृतिक संवादाच्या बळावर जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचे मुख्यमंत्र्यांचे विधान एक अत्यंत सकारात्मक आणि आशेचा किरण दाखवणारे आहे. या विधानामागील दृष्टिकोन एका व्यापक मानवी संस्कृतीच्या पुनरुत्थानाचा पाया रचणारा आहे. गेल्या काही दशकांत जगाने प्रचंड आर्थिक प्रगती केली, मात्र या प्रगतीसोबतच स्पर्धा, ईर्ष्या आणि प्रादेशिक वर्चस्ववादाची लढाई तीव्र झाली. जेव्हा जागतिक संबंध केवळ 'नफा आणि तोटा' या समीकरणावर ठरतात, तेव्हा मानवी संवेदना दुय्यम ठरतात. युक्रेन-रशिया संघर्ष असो वा गाझा पट्टीतील धुमसणारे वातावरण या सर्व संघर्षांच्या मुळाशी कुठे ना कुठे आर्थिक आणि राजकीय हितसंबंध दडलेले आहेत. अशा वेळी केवळ आर्थिक निर्बंध किंवा व्यापारी करारांनी शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही हे जगाने मान्य केले आहे. म्हणूनच मुख्यमंत्र्यांनी सुचवलेला सांस्कृतिक संवादाचा मार्ग अत्यंत समर्पक वाटतो. संस्कृती ही माणसाला माणसाशी जोडण्याचे काम करते. कला, साहित्य, संगीत आणि विचार यांची जेव्हा आंतरराष्ट्रीय स्तरावर मुक्त देवाणघेवाण होते, तेव्हा दोन देशांमधील भौगोलिक आणि राजकीय सीमा पुसट होतात. भारताकडे 'वसुधैव कुटुम्बकम' (संपूर्ण जग हेच एक कुटुंब आहे) हा उदात्त विचार देण्याचा समृद्ध वारसा आहे. मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यातही याच विचारांचे प्रतिबिंब उमटले आहे. जेव्हा आपण दुसऱ्या देशाची संस्कृती, त्यांच्या परंपरा आणि त्यांची जीवनपद्धती समजून घेतो, तेव्हा परस्परांबद्दलचा आदर वाढतो आणि संशयाचे वातावरण दूर होते. करुणा, सहिष्णुता, न्याय आणि बंधुभाव ही मानवी मूल्ये कोणत्याही देशाच्या सीमेत बद्ध नसतात. ती वैश्विक आहेत. आज जागतिक पातळीवर हवामान बदल, गरिबी, आणि साथीचे रोग यांसारखी मोठी संकटे उभी आहेत. या संकटांचा सामना करण्यासाठी केवळ निधी (फंडिंग) पुरेसा नाही, तर त्यामागे मानवतावादी दृष्टिकोन असणे गरजेचे आहे. मुख्यमंत्र्यांनी आपल्या विधानातून नेमका याच मुद्द्यावर बोट ठेवले आहे. विकास हा माणसाच्या कल्याणासाठी असावा, माणसाचा बळी देऊन मिळवलेला विकास निरर्थक आहे, ही सकारात्मक भावना आजच्या जागतिक नेतृत्वाने अंगीकारणे गरजेचे आहे. मुख्यमंत्र्यांच्या या भूमिकेमुळे समाज आणि प्रशासनात एक अत्यंत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. हे विधान केवळ आंतरराष्ट्रीय पातळीपुरते मर्यादित नसून ते स्थानिक स्तरावरही तितकेच लागू पडते. विविध जाती, धर्म आणि पंथांच्या लोकांनी एकत्र येऊन सांस्कृतिक सलोखा राखल्यास देशांतर्गत शांतताही अबाधित राहते. तरुणांमध्ये अशा विचारांचा प्रसार केल्यास ते उद्याचे जबाबदार आणि संवेदनशील जागतिक नागरिक बनू शकतील. आर्थिक प्रगती ही शरीरासारखी आहे, तर मानवी मूल्ये आणि संस्कृती हा त्याचा आत्मा आहे. आत्म्याशिवाय शरीर जसे मृतप्राय असते तसेच मानवी मूल्यांशिवाय असलेला आर्थिक विकास हा विद्ध्वंसक ठरू शकतो. मुख्यमंत्र्यांनी मांडलेला हा विचार जगाला युद्धाकडून शांततेकडे आणि संकुचिततेकडून व्यापकतेकडे घेऊन जाणारा आहे.**

# निरोगी महाराष्ट्राच्या दिशेने भक्कम वाटचाल...



महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात व्यापक परिवर्तन घडवून आणत 'निरोगी महाराष्ट्र, सक्षम महाराष्ट्र' या ध्येयाकडे भक्कम पावले टाकली आहेत. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, आधुनिक उपचार सुविधा, तंत्रज्ञानाधारित आरोग्य व्यवस्थापन, महिला व बाल आरोग्य संवर्धन, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांवरील नियंत्रण; तसेच लोकसहभागाच्या माध्यमातून राज्याची आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम होत आहे.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सार्वजनिक आरोग्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य सेवांचा विस्तार, गुणवत्तापूर्ण उपचार सुविधा आणि आरोग्य जनजागृती यावर विशेष भर देण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण ते शहरी भागापर्यंत लाखो नागरिकांना आरोग्य सेवांचा लाभ मिळत आहे. राज्यातील प्रत्येक गाव निरोगी, स्वच्छ आणि आरोग्यदृष्ट्या सक्षम व्हावे या उद्देशाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. ग्रामपंचायत, आशा सेविका, आरोग्य कर्मचारी, युवक मंडळे आणि ग्रामस्थ यांच्या सक्रिय सहभागातून गावागावात आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे.आरोग्य हा केवळ उपचारांचा विषय नसून लोकचळवळ बनावी, या दृष्टीने हा उपक्रम राज्यभर प्रभावीपणे विस्तारत आहे.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत राज्यात ८१७ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे,४३ नागरी सामुदायिक आरोग्य केंद्रे, १९०४ आयुष्मान आरोग्य मंदिरे, ६७५ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने कार्यरत आहेत. शहरी भागातील नागरिकांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात या यंत्रणांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी राबविण्यात आलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानाला राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या अभियानांतर्गत २.३५ लाखांहून अधिक आरोग्य शिबिरे,१.१३ कोटींहून अधिक महिलांची तपासणी करण्यात आली.उच्च रक्तदाब, मधुमेह, स्तन कर्करोग, गर्भाशय मुखाचा कर्करोग, रक्तक्षय यांसारख्या आजारांचे लवकर निदान करून महिलांना उपचार व समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.महिलांच्या रजोनिवृत्तीनंतर उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी राज्यातील जिल्हा आणि उपजिल्हा रुग्णालयांमध्ये मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्यात आली आहेत.

माता व बाल आरोग्य क्षेत्रात महाराष्ट्राने देशासाठी आदर्श निर्माण केला आहे.एसआरएस-२०२३ अहवालानुसार नवजात मृत्युदर ११, अर्भक मृत्युदर १४, पाच वर्षांखालील बालमृत्युदर १६ इतका कमी झाला आहे. भारताने २०३० पर्यंत साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले मानांकन महाराष्ट्राने आधीच गाठले आहे. राज्यातील विशेष नवजात शिशुकाळजी कक्ष, पोषण पुनर्वसन केंद्रे आणि स्तनपान व्यवस्थापन केंद्रांमुळे बाल आरोग्य सेवांना मोठे बळ मिळाले आहे. दोन कोटींहून अधिक बालकांची आरोग्य तपासणी. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत २.१३ कोटींहून अधिक बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. हजारो बालकांवर हृदय शस्त्रक्रिया व इतर जीवनरक्षक उपचार करून त्यांना नवजीवन देण्यात आले.

राज्यात नियमित लसीकरणाचे ९२ टक्के उद्दिष्ट साध्य झाले आहे.बालकांना विविध संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण देण्यासाठी व्यापक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षणासाठी एचपीव्ही लसीकरण मोहिमेलाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा ग्रामीण व निमशहरी भागात उपलब्ध व्हाव्यात यासाठी २३ नवीन कार्डियाक कॅथलॅब,लिथोट्रिप्सी सुविधा,अत्याधुनिक निदान सेवा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे. तसेच शासकीय रुग्णालयांमध्ये अनेक तपासण्या आणि उपचार मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राज्यात व्यापक प्रमाणात निदान, उपचार आणि पोषण सहाय्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.२०२५ मध्ये शोधण्यात आलेल्या क्षयरुग्णांपैकी ८८ टक्के रुग्ण उपचारानंतर बरे झाले आहेत. 'टीबी मुक्त भारत' अभियानाला महाराष्ट्रातून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत आहे.

मलेरिया, डेंग्यू, चिकुनगुनिया, कुष्ठरोग, हत्तीरोग आणि रेबीज यांसारख्या आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्यभर विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत.स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य कर्मचारी आणि नागरिक यांच्या सहभागामुळे या मोहिमांना प्रभावी यश मिळत आहे. कर्करोग आणि इतर गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये पॅलिएटिव्ह केअर सेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.घरभेटी, समुपदेशन, वेदना नियंत्रण आणि दूरवैद्यकीय सेवा यांमुळे हजारो कुटुंबांना आधार मिळत आहे.

राज्यात २०२५ मध्ये २३.६९ लाख युनिट रक्त संकलित झाले असून त्यापैकी ९९.५८ टक्के रक्तदान स्वैच्छिक स्वरूपाचे आहे.रक्तदान चळवळीत महाराष्ट्राने पुन्हा एकदा देशात अग्रस्थान कायम राखले आहे. सिकलसेल ॲनिमिया निर्मूलनासाठी राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये 'अरुणोदय' अभियान राबविण्यात येत आहे.तपासणी, समुपदेशन आणि जनजागृतीच्या माध्यमातून या आनुवंशिक आजाराविरुद्ध व्यापक लढा उभारण्यात आला आहे.

आधुनिक आरोग्य सुविधा, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, प्रशिक्षित मनुष्यबळ, महिला व बाल आरोग्यावरील विशेष भर, संसर्गजन्य रोग नियंत्रण आणि लोकसहभाग यांचा समन्वय साधत महाराष्ट्र आरोग्य क्षेत्रात नवे मानदंड निर्माण करीत आहे. ग्रामीण ते शहरी भागापर्यंत प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देत राज्य शासन 'निरोगी महाराष्ट्र, सक्षम महाराष्ट्र' या ध्येयाच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करीत आहे. लोकसहभाग, आधुनिक आरोग्य सेवा आणि सुजाण नागरिक यांच्या बळावर निरोगी महाराष्ट्राचे स्वप्न आता वास्तवात उतरू लागले आहे.

महाराष्ट्राच्या आरोग्य क्षेत्रात अतिशय सकारात्मक आणि उत्साहवर्धक वातावरण आहे. 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या उपक्रमामुळे प्रत्येक गावात आरोग्याबाबत नवी जागरूकता निर्माण झाली आहे. आशा सेविका, आरोग्य कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे गावोगावी स्वच्छता आणि आरोग्याचा संदेश पोहोचत आहे. शहरी भागात ८१७ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ४३ सामुदायिक आरोग्य केंद्रे आणि ६७५ आपला दवाखाना नागरिकांच्या अगदी जवळ आरोग्य सेवा देत आहेत. 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानातून १.१३ कोटींहून अधिक महिलांची तपासणी झाली असून मेनोपॉज क्लिनिकसारख्या नवीन सुविधा महिलांसाठी दिलासा ठरत आहेत.

लहान बाळांच्या आरोग्यासाठी राज्याने सुंदर प्रगती साधली आहे. बाल आरोग्य तपासणी, मोफत लसीकरण आणि नवीन कार्डियाक कॅथलॅब यांसारख्या सुविधा आता ग्रामीण भागापर्यंत पोहोचत आहेत. स्वैच्छिक रक्तदानात ९९.५८ टक्क्यांसह महाराष्ट्र पुन्हा देशात अव्वल ठरला आहे. लोकांच्या सहभागातून निरोगी महाराष्ट्राचे चित्र आणखी उजळ होत आहे.

**-दत्तात्रय कोकरे,**
विभागीय संपर्क अधिकारी, मुंबई

## बदलते तंत्रज्ञान



# 'या' चार समस्या दिसल्यास त्वरित बदला तुमचा स्मार्टफोन

स्मार्टफोन आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे, पण काही वेळा फोनमध्ये तांत्रिक गडबड नसतानाही तो आपल्याला एक 'अलर्ट' देत असतो की, आता नवीन फोन घेण्याची वेळ आली आहे. जर तुम्ही वेळीच हा इशारा ओळखला नाही, तर तुमचा महत्त्वाचा डेटा गमावणे, सायबर हल्ल्यांना बळी पडणे किंवा ऐन गरजेच्या वेळी फोन बंद पडणे, अशा समस्यांचा सामना करावा लागू शकतो.




फोनची बॅटरी हेल्थ ही तुमचा फोन जुना झाल्याची सर्वात मोठी ओळख आहे. जर तुमचा फोन ४०-५०% चार्ज असताना अचानक १०-२०%वर आला किंवा तुम्हाला दिवसभरात वारंवार फोन चार्ज करावा लागत असेल. याचा अर्थ बॅटरी खराब झाली आहे आणि हे नवीन स्मार्टफोन घेण्याचे स्पष्ट संकेत आहे. खराब बॅटरीमुळे फोन कधीही बंद पडू शकतो.

प्रत्येक कंपनी एका ठराविक काळानंतर जुन्या फोन्सना अपडेट्स देणे थांबवते. काही कंपन्या २-३ वर्षांसाठी, तर सॅमसंग आणि गुगलसारख्या कंपन्या ५-७ वर्षांसाठी अपडेट्स देतात. जर तुमच्या फोनला सिक्युरिटी अपडेट्स मिळणे बंद झाले असतील, तर हा फोन बदलण्याचा सर्वात योग्य काळ आहे. सुरक्षा अपडेट्सशिवाय तुमचा स्मार्टफोन सायबर हल्ल्यांसाठी खूप संवेदनशील बनतो. जुन्या सॉफ्टवेअरमुळे अनेक नवीन ॲप्स नीट चालत नाहीत आणि फोनचा परफॉरमन्सही ढासळतो.

जर तुम्ही फोन वापरत असताना तो अचानक बंद पडत असेल किंवा स्वतःहून रीस्टार्ट होत असेल, तर हा एक मोठा धोक्याचा संकेत आहे. याचा अर्थ तुमचा फोन आता एक्सपायरी डेटच्या जवळ पोहचला आहे आणि लवकरच तो पूर्णपणे बंद पडू शकतो. या परिस्थितीत, तुमचा महत्त्वाचा डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी तातडीने नवा फोन घेणे अधिक सुरक्षित आहे तसेच जुन्या फोनमधील डेटाचा बॅकअप घेणे विसरू नका.

फोन जुना झाल्यावर त्याची नेटवर्क पकडण्याची क्षमता कमकुवत होते. नेटवर्क पूर्णपणे गायब होणे किंवा सिग्नलची समस्या वारंवार जाणवणे. ॲप्स वारंवार क्रॅश होणे किंवा फोन खूप हँग होणे किंवा स्लो चालणे. हे सर्व संकेत स्पष्टपणे सांगतात की, आता तुमच्या फोनची क्षमता संपली आहे आणि अपग्रेडची वेळ आली आहे. जुन्या प्रोसेसरमुळे ॲप्सचा ताण तो सहन करू शकत नाही. जर तुमच्या फोनमध्ये वरीलपैकी दोन किंवा अधिक समस्या सतत दिसत असतील, तर नवीन फोन घ्या.

# क्रांतिकारक उमाजी नाईक



## निमित्त

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी घडून आलेल्या रामोशांच्या उठावात क्रांतिकारक उमाजी नाईक यांचे नेतृत्व महत्त्वाचे होते. त्यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिवडी (ता. पुरंदर) येथे झाला. वडील दादजी खोमणे हे पुरंदर किल्ल्याचे रखवालदार म्हणून काम करत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून अनेक किल्ल्यांची राखणदारी या समाजाकडे सोपविण्यात आली होती. उमाजी लहानपणापासून वडिलांसोबत पुरंदरच्या रखवालीचे काम करत. आपल्या वडिलांकडून त्यांनी गोफण चालविणे, तीरकमठा मारणे, कुऱ्हाड चालविणे, भाला फेकणे, तलवार व दांडपट्टा चालविणे इ. कौशल्ये आत्मसात केली होती. उमाजी ११ वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले (१८०२) आणि वंशपरंपरेने वतनदारी त्यांच्याकडे आली.

इंग्रजांच्या सल्ल्यावरून १८०३मध्ये दुसऱ्या बाजीरावाने पुरंदर किल्ला रामोशींच्या ताब्यातून काढून घेण्याचा प्रयत्न केला, या वेळी रामोशींनी कडाडून विरोध केला. त्यामुळे संतापलेल्या पेशव्यांनी रामोशी लोकांचे हक्क, वतने, जमिनी जप्त केल्या. उमाजींनी पेशव्यांच्या या अत्याचाराच्या विरुद्ध संघर्ष केला. उमाजी उत्तम संघटक होते. बरेचशे रामोशी त्यांना आपला नेता मानत होते. गरिबांना लुटणारे सावकार, वतनदार व जमीनदार यांना त्यांनी आपले लक्ष बनविले. गोरगरिबांना लुटून सावकार झालेल्या मुंबईच्या चानजी मातिया या पेढीवाल्याचा माल उमाजींनी पनवेल-खालापूरजवळ धाड घालून पळविला. तेव्हा उमाजी इंग्रजांच्या हाती लागले व त्यांना एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा झाली. तुरुंगातून सुटल्यानंतर एका दरोड्यात ते पुन्हा पकडले गेले व त्यांना सात वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. कैदेत असताना ते लेखन-वाचन शिकले.


उमाजी खंडोबाचा भक्त होते. त्यांच्या पत्रावर 'खंडोबा प्रसन्न' असे शीर्षक दिसते. त्यांचा भाऊ आमृता याने सत्तू बेरडाच्या नेतृत्वाखाली इंग्रजांचा भांबुर्ड्याचा लष्करी खजिना लुटला (१८२४-२५). या लुटीमध्ये उमाजींची भूमिका महत्त्वाची होती. १८२५मध्ये सत्तू मृत्यू पावल्यानंतर त्याच्या टोळीचे उमाजी प्रमुख झाले. उमाजींविरुद्ध इंग्रज सरकारकडे तक्रारी वाढल्याने २८ ऑक्टोबर १८२६ रोजी इंग्रजांनी त्यांच्याविरुद्ध पहिला जाहीरनामा काढला. यामध्ये उमाजी व त्यांचा साथीदार पांडूजी यांना पकडून देणाऱ्यांना १०० रु.चे बक्षीस जाहीर केले, तर दुसऱ्या जाहीरनाम्यात उमाजीला साथ देणाऱ्यांना ठार मारण्यात येईल, असे जाहीर केले. परिणामी उमाजींनी इंग्रजांविरुद्ध मोहिमच सुरू केली. भिवडी, किकवी, परिंचे, सासवड व जेजुरी भागात त्यांनी लुटालूट केली. त्यामुळे इंग्रज सरकारने उमाजींना पकडण्यासाठी स्वतंत्र घोडदळाची नियुक्ती केली व १५२ ठिकाणी चौक्या बसविल्या, परंतु उमाजी इंग्रजांच्या हाती सापडले नाहीत.

८ ऑगस्ट १८२७रोजी इंग्रजांनी पुन्हा एक जाहीरनामा काढून उमाजींना पकडण्याचे आवाहन केले. जे लोक सरकारला मदत करणार नाहीत, त्यांना उमाजीचे साथीदार समजण्यात येईल असे घोषित केले, मात्र त्याचा उपयोग झाला नाही. इंग्रजांनी जनतेला पैशाचे आमिष दाखवत उमाजींना पकडणाऱ्यास १२०० रु. चे बक्षीस जाहीर केले. या काळात उमाजींचा दबदबा वाढला. त्यांनी न्यायनिवाडा सुरू केला.

८ ऑगस्ट १८३१ रोजी इंग्रजांनी आणखी एक जाहीरनामा काढून उमाजींना पकडून देणाऱ्यास १० हजार रु. बक्षीस व ४०० बिघे जमीन देण्याचे जाहीर केले. या आमिषाला उमाजीचे दोन साथीदार काळू व नाना हे बळी पडले. त्यांनी उमाजींना १५ डिसेंबर १८३१ रोजी स्वतः पकडून इंग्रजांच्या स्वाधीन केले. त्यानंतर इंग्रजांनी उमाजींना पुणे येथे ३ फेब्रुवारी १८३४ रोजी फाशी दिली.

**(साभार मराठी विश्वकोष)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# बहुगुणी नारळाचे विविध फायदे जाणून घ्या



नारळ आणि कोलेस्ट्रॉल याबद्दलचे प्रवाद अनेक वर्ष सुरू आहेत. त्यामुळे नारळ आणि त्याबाबतीतले गैरसमजदेखील त्याच वेगाने पसरलेले आहेत. भारतीय आहारात नारळाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मग कोशिंबीर असो किंवा पालेभाज्या. सणासुदीला नारळाचे दूध, ओलं खोबरं सढळ हस्ते वापरलं जातं. अनेक घरात सुंदर केस आणि तंदुरुस्त शरीरयष्टी असणाऱ्या कुटुंबांमध्ये आहारात नारळाचा सर्रास वापर केला जातो.

आहार शास्त्रातदेखील नारळ आणि नारळाच्या पदार्थांचे महत्त्व तितकंच आहे. अगदी नारळ पाणी ते नारळाचं तेल यासारख्या नारळाच्या विविध रूपांचा आहारामध्ये समावेश केला जातो. मधल्या काही काळामध्ये नारळावर एक सरसकट बंदी आली होती. जिथे नारळ खाणे किंवा खोबरं खाणेच किती अपायकारक आहे याबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या जात असत, मात्र आयुर्वेद आणि आहार शास्त्रानुसार नारळ हा अत्यंत औषधी गुणकारी आणि आरोग्यवर्धक आहे. नारळाचं पाणी थंड गुणाचे आहे. शरीरातील अतिरिक्त चरबीला आला घालण्यासाठी नारळपाणी अत्यंत उपयुक्त आहे. किंबहुना सातत्याने स्पर्धात्मक व्यायाम करणाऱ्यांसाठीदेखील नारळपाणी अत्यंत गुणकारी आहे.

शरीरातील क्षारांचे प्रमाण योग्य प्रमाणात राखण्यासाठी आणि आर्द्रता पुन्हा पूर्ववत करण्यासाठी नारळपाणी उपयुक्त आहे. नारळ पाण्यामध्ये ग्लुकोज प्रथिन पोटॅशियम सोडियम क्लोराइड ही सगळी पोषणमूल्य नारळाच्या पाण्याचे महत्त्व वाढवतात. नारळाच्या पाण्यामध्ये जीवनसत्व अ तसंच जीवनसत्व ब याचे प्रमाण उत्तम असते. त्याचप्रमाणे ओल्या खोबऱ्याचा विचार करायला गेला तर त्याच्यामध्ये उत्तम प्रमाणात स्निग्ध पदार्थ असतात तसेच चवीला ते हलके गोड असते. ओल्या खोबऱ्याचे दूध मोठ्या प्रमाणावर पाश्चात्त्य देशांमध्ये आणि भारतातदेखील वापरले जाते. वेगवेगळ्या प्रकारच्या विशेषतः गोड पदार्थ तयार करण्यासाठी ओल्या खोबऱ्याच्या दुधासारखे उत्तम द्रव्य नाही.

# गणेशोत्सवापूर्वी सर्व ग्रामपंचायतींनी साफसफाई अभियान राबवावे -सभापती



**चौक : प्रतिनिधी**

बाप्पाच्या आगमनापूर्वीच खालापूर तालुक्यात स्वच्छतेसह आरोग्य जागर करावा व गणेशोत्सवात लागणारी सर्व तयारी पूर्ण करावी हे अभियान तालुक्यातील सर्वच ग्राम पंचायत यांनी करावे, असे आवाहन सभापती कृष्णा पारंगे यांनी केले आहे.या बैठकीला उपसभापती भाई शिंदे, गटविकास अधिकारी संदीप कराड उपस्थित होते.

आगामी गणेशोत्सवा पूर्वी खालापूर तालुक्यात सर्व ग्रामपंचायतीत रस्ते, चौक, मंदिरे, मंडप परिसरात साफसफाई,पिण्याचे शुद्ध पाणी, गटारे साफसफाई मोहीम राबविली जाणार असून खालापूर पंचायत समितीच्या निरोगी व स्वच्छ गणेशोत्सव उपक्रम राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.त्यासाठी सरपंच, उपसरपंच, ग्राम पंचायत अधिकारी यांची संयुक्त बैठक पंचायत समितीच्या सभागृहात पार पडली.त्या बैठकीत सभापती कृष्णा पारंगे,उपसभापती भाई शिंदे, गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी मार्गदर्शन केले.

गणेशोत्सवापूर्वी रस्ते, चौक,मंदिरे, मंडप परिसर स्वच्छ करण, नाले-गटारे स्तच्छ ठैवणे बंधनकारक आहे.डेंगयूच्या पार्श्वभीूवर पाणी साचू नये,यासाठी दक्षता घ्यावी.विसर्जन घाटांची स्वच्छता व दुरुस्तीकरण्यात यावी.भाविकांना स्वचछ पिण्याचे पाणी देणे, निर्माल्य संकलनाची व्यवस्था करणे आणि आरोग्य विषयक जनजागृती करण्याच्या सूचना दैण्यातआल्या आहेत.प्रत्येक ग्राम पंचायत स्तरावर गणेशोत्सव तयारीचा आढावा घेण्यात येणार आहे. ग्रामपंचायतस्तरावरील कार्यवाहीची नोंद ठेवूनछायाचित्रांसह अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.

नागरिकांनी ही यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.जनजागृतीसाठी ग्रामपंचायत, शाळा,अंगणवाडी आणि गणेश मंडळांच्या ठिकाणी माहितीपत्रके व फलक लावण्यात यावे. आशा सेविका,अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारीआणि स्वयंसेवकांच्या माध्यमातून घरभेटी घेऊन जनजागृती करण्याचेनिर्देश देण्यात आले.



**पेण : तालुक्यातील वाशी नाका येथील दहीहंडी उत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थिती लावली. यावेळी सलामी देणाऱ्या पथकाचा सन्मान करताना आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष वैकुंठ पाटील व इतर मान्यवर.**

# पेणमध्ये शिवकन्या महिला गोविंदा पथकाकडून दहीहंडी उत्सव



**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील एकमेव महिला गोविंदा पथक म्हणून ओळख असलेल्या शिवकन्या महिला गोविंदा पथकाने यंदाही छत्रपती शिवाजी महाराज चौकात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. सुमारे ८०० महिला सदस्यांचा सहभाग असलेल्या या पथकाने शिस्तबद्ध पद्धतीने दहीहंडी उत्सवाची परंपरा कायम राखली.

महिलांना दैनंदिन जीवनातील जबाबदाऱ्यांमधून काही काळ मुक्त होऊन मनमुराद आनंद घेता यावा, त्यांच्यातील कलागुणांना आणि उत्साहाला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने शिवकन्या महिला गोविंदा पथकाची स्थापना करण्यात आली आहे. दरवर्षी या पथकाच्या माध्यमातून महिलांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळतो. यंदाच्या दहीहंडी उत्सवात विविध गाण्यांच्या ठेक्यावर महिलांनी ताल धरत जल्लोष केला. शिस्त, एकजूट आणि उत्साहाचे दर्शन घडवत महिला गोविंदांनी दहीहंडी उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला.

या उत्सवामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. दीपश्री पोटफोडे, डॉ. नीता कदम, दीपिका शिगवण आणि जागृती जैन यांच्यासह महिला सदस्यांनी उत्सवाच्या आयोजनासाठी विशेष मेहनत घेतली. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा यंदाही उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडली.

# भाजप अल्पसंख्याक मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी मोहसीन शेख; आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान



**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक उत्तर रायगड जिल्हा उपजिल्हाप्रमुख पदी मोहसीन शेख यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. खोपोली येथे आयोजित भव्य गोकुळाष्टमी व दहीहंडी उत्सवाच्या उत्साही वातावरणात भाजपचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या शुभहस्ते त्यांना हे नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

या भव्य सोहळ्याप्रसंगी भाजपचे ज्येष्ठ अल्पसंख्यांक नेते हाजी भाई अराफात यांनी मोहसीन शेख यांना पुष्पगुच्छ देऊन भावी सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी विशेष शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमास जिल्हाप्रमुख अविनाश कोळी खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम यशवंत साबळे, भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक, भाजपचे शहराध्यक्ष अजय इंगुलकर, सरचिटणीस विनायक माडपे, विकास नाईक, भाजपचे सर्व नगरसेवक व नेते मंडळी, प्रमुख पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळा येथील वैजनाथ मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरातील निसर्गरम्य अशा दक्षिणेकडील भागात असणारे श्रीवैजनाथ शिवमंदिर तळ्यातील प्रसिध्द तिर्थक्षेत्र आहे. या मंदिरात दर्शनासाठी जायच म्हटल तर तळा शहरात आल्या नंतर हायस्कुल कडून महादेवाच्या तळ्याजवळील प्रथम श्रीहरिहरेश्वर या शिवमंदिराचे दर्शन घडते या मंदिराच्या पुढे अंदाजे २०० मीटर अंतरावरती श्रीवैजनाथ मंदिर आहे

आजच्या घडीला हे प्राचीन मंदिर दुर्लक्षित असून या मंदिराच्या प्रवेशाला वैशिष्टपूर्ण असे लाकड्या मारूती मंदिराचे दर्शन घेऊन पुढे मंदिरा समोरील प्रसिद्ध ब्रम्हाळी तलावाच्या बाजूने पुढे जावे लागते प्रथम दिपस्तंभ आहे दिपस्तंभ लागल्यानंतर पुढे पूर्ण तलावाला अर्धा फेरा झाला की मंदिरासमोर नंदिचे दर्शन घेतल्यानंतर पुढे कौलारू असे भव्य मंदिर आहे. या मंदिरात लाकडाचे मोठ मोठे खांब आहेत या भव्य अशा खाबांवरती हे मंदिर उभे आहे. या मंदिरावरील हे लाकडी काम रेखीव आकर्षक आहे . मात्र यात रंगकाम अथवा डागडुजी चांगल्या प्रकारे केल्यास आकर्षक दिसून भव्य असा हा सुंदर सभागृह पहावयास मिळेल. एवढे सुंदर व काटकोनात रचना असलेले हे मंदिर आहे सुरूवातीचे जुने(गाभारा) मंदिर हे हेमांडपंथी बांधणीचे असावे त्यामुळे या गाभारयात प्रवेश केल्यानंतर मनाला शांती लाभून मोठ्या उत्साही व आनंदी अशा मन प्रसन्नतेने शिवलिंगाचे दर्शन घडते

या मंदिरातील शिवलिंगाचे दर्शन म्हणजे भक्तांसाठी पर्वणी असून चिंता मनातील विकार दूर होऊन आपल्या मनातील संकल्प पुर्ण होते असे हे एक शिवमंदिर आहे या मंदिराच्या समोर असणारी कमान हि आकर्षण ठरत आहे.सर्व मंदिर परिसर भव्य व शांतता असून एक भक्तीमय वातावर व निसर्गाचा लाभलेला ठेवा असल्याने श्रावण मासात पर्यटक व शिवभक्त दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात येतात.



# पत्नीला आणण्यासाठी निघालेल्या तरुणाचा अपघातात मृत्यू

**रेवदंडा : प्रतिनिधी**

पत्नीला रोहा येथून घरी आणण्यासाठी मोटारसायकलवरून निघालेल्या ३२ वर्षीय तरुणाचा समोरून आलेल्या भरधाव बुलेट मोटारसायकलशी झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. हा अपघात शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास सुडकोली गावाच्या हद्दीत अलिबाग-रोहा मार्गावर घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिकेत अशोक भगत (वय ३२, रा. उमटे, पो. रामराज, ता. अलिबाग) हे पत्नीला रोहा येथून घरी आणण्यासाठी त्यांच्या मोटारसायकलवरून अलिबाग-रोहा मार्गाने जात होते. सुडकोली परिसरात ते आले असता रोहा बाजूकडून अलिबागच्या दिशेने येणाऱ्या बुलेट मोटारसायकल क्रमांक एमएच-०६-जीटी-००२७ ने त्यांच्या मोटारसायकलला समोरून जोरदार धडक दिली.धडक इतकी भीषण होती की, अनिकेत भगत यांच्या डोक्याला व चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली. गंभीर दुखापतीमुळे त्यांचा मृत्यू झाला. अपघातात दोन्ही मोटारसायकलींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून बुलेटस्वारालाही लहान-मोठ्या दुखापती झाल्या आहेत.

या प्रकरणी अमित पोपटराव जाधव (वय ३६, रा. फणसापूर, ता. अलिबाग, जि. रायगड) यांच्याविरुद्ध रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक म्हशीलकर, रेवदंडा पोलीस ठाणे करीत आहेत.



**अलिबाग : भाजपच्या दहीहंडी स्पर्धेत थरांची सलामी देताना टिपलेले गावदेवी गोंधळपाडा गोविंदा पथक.**


## जाहिर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे तुरमाळे, तालुका-पनवेल, जि. रायगड येथील श्री. गोपाळ जुगलकिशोर बरासीया व सौ. सुनिता गोपाळ बरासीया यांच्या मालकी हक्कांची व त्यांचे ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली मिळकत आमचे आशिल कायमस्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे तुरमाळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नाव | सर्व्हे/गट/ हिस्सा नं. | क्षेत्र | आकार आर चौ.मी |
|---|---|---|---|
| १) श्री. गोपाळ जुगलकिशोर बरासीया | २७/३/ब | ७५.६०.०० (बिनशेती) | ७५६ |
| २) सौ. सुनिता गोपाळ बरासीया | २७/३/अ/१ | ००-४०-०० | ८.०० |

सदरहू जागा, जमीन, मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कूळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्यावर समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात याप्रमाणे विहीत मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजाविरहित आहेत व हरकत असल्यास ती सोडुन दिली आहे असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणा-या कोणत्याहि हरकतीस आमचे आशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०८/०९/२०२६**

**सही/-**
**ॲड. चेतन भास्कर जाधव**
**पत्ता-फ्लॅट क्र.०२ पुष्कर सो.,**
**प्रांत ऑफिस जवळ, ठाणा नाका रोड,**
**ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६**
**मोबाईल क्रमांक-९८९२७३९११५**





# किटकजन्य आजार रोखण्यासाठी उपाययोजना

## पनवेल मनपाकडून अंमलबजावणी; सहकार्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात मलेरिया, डेंग्यू आणि चिकनगुनिया यांसारख्या किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेने प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली असून नागरिकांनी सर्वेक्षणास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

याअंतर्गत विविध सोसायट्या, निवासी संकुले तसेच घरांमध्ये डासांची उत्पत्तीस्थाने शोधण्यासाठी नियमित सर्वेक्षण करण्यात येत आहे. नागरिकांनी या सर्वेक्षणास सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. पावसाळ्यात विविध ठिकाणी पाणी साचल्यामुळे डासांची उत्पत्ती वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे डासजन्य आजारांचा धोका वाढतो. डेंग्यू, मलेरिया व चिकनगुनिया यांसारख्या आजारांचा प्रसार डासांमार्फत होत असल्याने नागरिकांनी आपल्या घरात तसेच परिसरात पाणी साचणार नाही,





याची विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे.

घरातील पाण्याच्या टाक्या, भांडी, कुंड्या, टायर, नारळाच्या करवंट्या तसेच इतर ठिकाणी साचलेले पाणी नियमितपणे काढून टाकावे. पाण्याची भांडी झाकून ठेवावीत आणि घराभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. किटकजन्य आजारांच्या नियंत्रणासाठी महापालिकेचे कर्मचारी विविध सोसायट्या, निवासी संकुले, बांधकामस्थळे तसेच घरांमध्ये भेट देऊन सर्वेक्षण करीत आहेत. नागरिकांनी आपल्या घरात व परिसरात पाणी साचू न देण्याबरोबरच सर्वेक्षणासाठी येणाऱ्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी आनंद गोसावी यांनी केले आहे.

डेंग्यू, मलेरिया किंवा चिकनगुनियाची लक्षणे आढळल्यास नागरिकांनी स्वतःहून औषधोपचार न करता वैद्यकीय तपासणी करून घ्यावी. ताप, अंगदुखी, डोकेदुखी, अशक्तपणा यांसारखी लक्षणे जाणवल्यास जवळच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात तपासणी करून घेणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार रक्त तपासणी तसेच पुढील उपचाराची सुविधा महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात आली आहे.

दरम्यान, किटकजन्य आजारांचा प्रतिबंध करण्यासाठी महानगरपालिकेबरोबर नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या घरासह परिसरात स्वच्छता राखून पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी आणि महापालिकेच्या सर्वेक्षण आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांना सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# कोपरखैरणेत गणेशोत्सवासाठी डीजे-डॉल्बीवर पोलिसांची बंदी

**नवी मुंबई : बातमीदार**

आगामी गणेशोत्सव व नवरात्रौत्सव सण-उत्सव डीजे आणि डॉल्बीमुक्त वातावरणात शांततेत पार पाडण्यासाठी कोपरखैरणे पोलीस ठाण्याच्या वतीने विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. उत्सवाच्या काळात डीजे व मोठ्या क्षमतेच्या ध्वनिक्षेपकांमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

याबाबत माहिती देताना कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल देशमुख यांनी सांगितले की, पोलीस आयुक्त नवी मुंबई व पोलीस उपायुक्त परिमंडळ-१ यांच्या सूचनेनुसार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, डीजे चालक-मालक, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व नगरसेवक यांची बैठक घेण्यात आली आहे. या बैठकीत सर्व मंडळांना उत्सवादरम्यान, आगमन व विसर्जन मिरवणुकीत कोणत्याही परिस्थितीत डीजे अथवा डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईट्सचा वापर न करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

उच्च न्यायालय व शासनाने ठरवून दिलेल्या ध्वनीमर्यादेच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. नियमांचे उल्लंघन करून डीजे किंवा साऊंड सिस्टीम वाजवल्यास संबंधित मंडळ, आयोजक, डीजे मालक व चालकांवर तत्काळ गुन्हे दाखल करून त्यांची साऊंड सिस्टीम जप्त केली जाईल, असा सज्जड इशारा वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल देशमुख यांनी दिला आहे. दरम्यान, यंदा कोपरखैरणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत जवळपास ५७ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी आपली नोंदणी केली असून नागरिकांमध्ये उत्सवाचा मोठा उत्साह दिसून येत आहे. उत्सवानिमित्त मंडळांनी देखाव्यांसोबत किंवा मंडप परिसरात 'नशामुक्ती'बाबत प्रबोधन करणारे फलक आणि बॅनर लावून समाजात जनजागृती करावी, असे आवाहनदेखील पोलिसांनी संबंधितांना केले आहे.

> **उत्सव साजरा करा, मात्र ध्वनिप्रदूषण करू नका, या भावनेतून सर्व गणेशभक्त, आयोजक आणि नागरिकांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे व उत्सव शांततेत पार पाडावा.**
> **-अमोल देशमुख,**
> वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोपरखैरणे पोलीस ठाणे

# नेरूळमध्ये शनिमंदिरातील दानपेटी फोडून रोकड लंपास

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ परिसरात असलेल्या शनिमंदिरातील दानपेटी फोडून रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. चोरीचा हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू आहे.

येथील दत्तगुरु कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादितच्या आवारात हे शनिमंदिर आहे. चोरट्याने मंदिरातील दानपेटी फोडून त्यातील रोकड लांबवली. मिळालेल्या माहितीनुसार, सोसायटीने नेमलेले पुजारी बालाप्रसाद त्रिपाठी सकाळी नेहमीप्रमाणे पूजा आटोपून नाश्ता करण्यासाठी गेले होते. नाश्ता करून ते मंदिरात परतले असता दानपेटीचे कुलूप तुटलेले आणि त्यातील सर्व रक्कम चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ या घटनेची माहिती सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना दिली. प्रकार स्पष्ट झाल्यानंतर सोसायटीच्या सचिवांनी नेरूळ पोलीस ठाण्यात जाऊन रीतसर तक्रार दाखल केली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. मंदिराच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता संशयित व्यक्ती दानपेटीतून पैसे काढताना दिसत आहे. फुटेजच्या आधारे नेरूळ पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत. अलीकडच्या काळात विविध मंदिरांमधील दानपेट्या फोडून चोऱ्या होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

# नवी मुंबईत एकवटला भारत | मानसिक गणित स्पर्धेसाठी ७०००हून अधिक विद्यार्थ्यांची उपस्थिती

**नवी मुंबई : बातमीदार**

२८ राज्ये आणि आठ केंद्रशासित प्रदेशांमधील सात हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी आपले गणितीय कौशल्य, एकाग्रता आणि मानसिक चपळाईचे प्रदर्शन २५व्या यूसीएमएएस राष्ट्रीय स्पर्धा २०२६मध्ये केले. ५ आणि ६ सप्टेंबर रोजी वाशी, नवी मुंबई येथील सिडको प्रदर्शन व अधिवेशन केंद्रात या दोन दिवसीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याची सांगता रविवारी झाली.

चार हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. या दोन दिवसीय स्पर्धेसाठी संपूर्ण भारतातून विद्यार्थी आल्याने नवी मुंबईत गणित स्पर्धेच्या निमित्ताने भारत एकवटल्याचे दृश्य वाशीत पाहायला मिळाले. भारतातील मानसिक गणित आणि मुलांच्या बौद्धिक कौशल्यांच्या विकासासाठी समर्पित असलेल्या प्रमुख व्यासपीठांपैकी एक असलेल्या या



स्पर्धेला १४ हजारांहून अधिक पालक आणि अभ्यागतांनी उपस्थिती लावली. त्यामुळे यूसीएमएएसच्या या महत्त्वपूर्ण रौप्यमहोत्सवी स्पर्धेला देशभरातील युवा प्रतिभेचा उत्सव असे स्वरूप प्राप्त झाले.

स्पर्धेला महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीज ऑफ इंडिया अर्थात एफआयआयचे अध्यक्ष भालचंद्रसिंग रावराणे, तसेच यूसीएमएएसच्या आंतरराष्ट्रीय नेतृत्वाची प्रमुख उपस्थिती लाभली. यामध्ये प्रा. डॉ. डिनो वोंग, यूसीएमएएसचे संस्थापक आणि यूसीएमएएस आंतरराष्ट्रीय मुख्यालय, मलेशियाचे अध्यक्ष; अलेक्सन वोंग, जागतिक मुख्य कार्यकारी अधिकारी, यूसीएमएएस आंतरराष्ट्रीय मुख्यालय, मलेशिया; वोंग, महाव्यवस्थापक, यूसीएमएएस आंतरराष्ट्रीय मुख्यालय, मलेशिया; आणि स्नेहल करिया, अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, यूसीएमएएस इंडिया अँड नेपाळ तसेच यूसीएमएएस अमेरिका व कॅनडाच्या संयुक्त अध्यक्ष यांचा समावेश होता.

स्पर्धेत विद्यार्थ्यांना केवळ आठ मिनिटांत २०० अंकगणितीय प्रश्न सोडवण्याचे आव्हान देण्यात आले. अबॅकस-आधारित आणि मानसिक गणना तंत्रांचा वापर करत विद्यार्थ्यांनी केवळ वेग आणि अचूकताच नव्हे, तर एकाग्रता, स्मरणशक्ती, दृश्यात्मक कल्पनाशक्ती आणि दबावाखाली प्रभावीपणे काम करण्याची क्षमता देखील दाखवली.या महत्त्वपूर्ण टप्प्याबद्दल बोलताना सिम्प्लिसिओ मेनेझेस, बिझनेस हेड, यूसीएमएएस इंडिया म्हणाले की, देशभरातील ७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना एका व्यासपीठावर एकत्र आणणे हे पारंपरिक शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या पलीकडे मुलांच्या क्षमतांच्या विकासावर पालकांचा वाढता भर दर्शवते. मुलांनी दाखवलेला आत्मविश्वास, शिस्त व एकाग्रता उल्लेखनीय आहे. २५वी राष्ट्रीय स्पर्धा हे देशाच्या कानाकोपऱ्यातील युवा प्रतिभेचा उत्सव बनलेल्या या व्यासपीठाच्या उत्क्रांतीचे प्रतीक आहे.

# स्मार्ट सिटी नवी मुंबईतील गावे आणि गावठाणांमध्ये पारंपरिक दहीहंडीचा जल्लोष

**नवी मुंबई : बातमीदार**

स्मार्ट सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबई शहरात एकीकडे दहीहंडी उत्सवाची स्पर्धा रंगत असते, मात्र दुसरीकडे याच शहरातील गाव-गावठाणात आजही दहीहंडी उत्सव एक गाव एक हंडी या स्वरूपात पारंपरिक पद्धतीने साजरा केला जात असून यंदाही गावोगावी हा सण साजरा करण्यात आला.

शहराचे रूपडे जरी बदललेले असले, तरी येथील ग्रामस्थांनी आपल्या सणांच्या परंपरा अनेक वर्षांपासून जपल्या आहेत. त्यातीलच एक म्हणजे दहीहंडी उत्सव. काळ बदलतो, तसे शहर बदलते; मात्र गावकीचा मान असलेल्या बोली हंड्यांची परंपरा अजूनही कायम असल्याचे दिसून येत आहे. आगरी आणि कोळी समाजाचे विशेष आकर्षण असलेली गावकीची बोली दहीहंडी ही गावातल्या एका मंदिरात बांधली जाते. या बोली दहीहंडीत अख्खे गाव सहभागी होते.

गावातून आधी ढोल-ताशाच्या गजरात हंडी घेऊन पालखी मिरवणूक काढली जाते. त्यानंतर पालखी ज्या वेळी गावातील मंदिरात पोहोचते, त्यानंतर बोली सुरू केली जाते. बोली हंडीची परंपरा तुर्भे गाव, कोपरखैरणे, सानपाडा, कोपरी गाव, घणसोली, गोठीवली, ऐरोली गाव, दिवा गाव, नेरूळ अशा २९ गावांमधून अनेक गावांनी आजही जोपासली





आहे. बोली हंडीची जी काही रक्कम असते, ती गावातील आध्यात्मिक कार्यासाठी वापरली जाते.

**घणसोली, कोपरखैरणेत दहीहंडीला वारकरी संप्रदायाची जोड**

स्वातंत्र्यसैनिकांचे गाव म्हणून ओळख असलेल्या घणसोलीमधील ग्रामस्थांनी दहीहंडी उत्सवाची १२५ वर्षांची परंपरा जपली आहे. गावात दहीहंडी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते. त्याखालोखाल कोपरखैरणे गावात देखील १९६० पासून सप्ताहाचे आयोजन करून दहीहंडी उत्सव साजरा केला जातो. तर आग्रोली गावात देखील १९६१ पासून एक गाव एक हंडीची परंपरा कायम आहे.याव्यतिरिक्त शिरवणे गावात पिढ्यानपिढ्या उंच उडी मारून डोक्याने हंडी फोडण्याची परंपरा सुरू आहे. पावणे गावात डोळ्यांवर पट्टी बांधून दहीहंडी फोडली जाते. सानपाडा गावात रात्रीच्या हंड्या फोडल्या जातात.

**कोपरी गावातील हंडीला एक लाख ३० हजारांची बोली**

कोपरी गावातही श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडीचा सण पारंपरिक पद्धतीने यावर्षीही साजरा करण्यात आला. रात्री भंडारा भरून श्रीकृष्ण अध्याय वाचनाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर श्रीकृष्ण जन्माचा पाळणा गीत गाऊन व आरती करून जन्माष्टमी साजरी करण्यात येते. तसेच सकाळी गावातील गावदेवी मंदिरात बोली दहीहंडी बांधण्याची परंपरा आहे. ही हंडी फोडण्यासाठी गावातील ग्रामस्थांकडून बोली लावून फोडली जाते. गावातील समाजसेवक वैभव ठाकूर यांनी एक लाख ३० हजार रुपयांची बोली लावून हंडी फोडण्याचा बहुमान पटकावत आपली मुलगी निवाच्या हस्ते हंडी फोडली. कोपरीतील यंदाची बोली आजवरची विक्रमी ठरली आहे.

# ऐरोलीतील गोविंदाचा थरावरून पडून मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई, नवी मुंबई, ठाण्यात गोपाळकाल्यानिमित्त शनिवारी गोविंदांचा उत्साह शिगेला पोहोचला. दहीहंडी साजरी करताना मुंबई, ठाण्यात अनेक गोविंदा जखमी झाल्याची नोंद असतानाच नवी मुंबईत दुर्दैवी घटना घडली. शनिवारी रात्री ऐरोलीतील साईनाथवाडी येथील स्वप्नील नवर या तरुणाचा गोविंदा खेळताना थरावरून पडून मृत्यू झाला. त्याला पालिकेच्या वाशी रुग्णालयात आणले असता मृत्यू झाल्याचे वाशीच्या पालिका रुग्णालयाचे अधीक्षक रवींद्र म्हात्रे यांनी सांगितले.

सायंकाळी जुईनगर येथील महिला पथकाच्या १० मुलींवर किरकोळ उपचार करून त्यांना सोडण्यात आले, तर जुहूगाव येथील गुप्ता नामक किशोरवयीन युवकाचा गोविंदा खेळताना हात फ्रॅक्चर झाला. पालिकेच्या वाशी रुग्णालयात त्याच्यावर उपचार करण्यात आले.

# नेरूळ स्टेशनसमोर मद्यधुंद चालकाचा हैदोस

## भरदिवसा तरुणावर चाकूहल्ल्याचा प्रयत्न

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील नेरूळ रेल्वे स्टेशन परिसरात मद्यधुंद चारचाकी चालकाने तरुणाच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न करून त्याच्यावर चाकूने हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या घटनेमुळे स्टेशन परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. नेरूळ रेल्वे स्टेशन परिसरात सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास हा थरारक प्रकार घडला.

एका मद्यधुंद चारचाकी चालकाने बेदरकारपणे वाहन चालवत एका तरुणाच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने या घटनेत तरुण बचावला, मात्र या प्रकाराचा जाब विचारण्यासाठी गेला असता संतापलेल्या चालकाने त्याच्यावर थेट चाकूहल्ला करण्याचा प्रयत्न केला. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार सायंकाळी नेहमीप्रमाणे स्टेशन परिसरात नागरिकांची मोठी वर्दळ होती. याच वेळी एक चारचाकी चालक मद्यधुंद अवस्थेत बेधुंदपणे गाडी चालवत आला आणि त्याने रस्ता ओलांडणाऱ्या तरुणाला उडवण्याचा प्रयत्न केला. तरुण तत्परतेने बाजूला झाल्याने मोठा अपघात टळला.



याबद्दल चालकाला जाब विचारला असता मद्यधुंद चालकाने गाडीतून बाहेर येत हुज्जत घातली आणि अचानक चाकू काढून तरुणावर वार करण्याचा प्रयत्न केला. नागरिकांनी प्रसंगावधान दाखवत मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केल्याने पुढील अनर्थ टळला. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नेरुळ स्टेशन भागातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकरणाची तत्काळ दखल घेऊन पोलिसांनी संबंधित वाहनचालकावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रत्यक्षदर्शी व स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

# वाशीतील पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची परदेशात धूम : अमेरिका-स्वित्झर्लंडला रवाना

**नवी मुंबई : बातमीदार**

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून अंतिम टप्प्यातील कामांना वेग आला आहे. पर्यावरणपूरक मूर्तींना यंदा मोठी पसंती मिळत असून वाशीतील सद्गुरू आर्टच्या शाडू मातीच्या सात ते आठ मूर्ती अमेरिका आणि स्वित्झर्लंडला रवाना झाल्या आहेत. वाशी परिसरातील मूर्तिकारांच्या कार्यशाळांमध्ये सध्या गणेशमूर्तींच्या अंतिम कामाला वेग आला आहे. यंदा पर्यावरणपूरक गणेशमूर्तींना नागरिकांकडून मोठी पसंती मिळत असून या मागणीची व्याप्ती आता थेट परदेशापर्यंत पोहोचली आहे.

वाशीतील सद्गुरू आर्ट यांच्या पर्यावरणपूरक शाडू मातीच्या सात ते आठ गणेशमूर्ती अमेरिका आणि स्वित्झर्लंड येथे रवाना झाल्या आहेत. महाराष्ट्रातील गणेशोत्सवाची परंपरा आता सातासमुद्रापारही मोठ्या उत्साहाने जपली जात आहे. नोकरी, व्यवसाय आणि शिक्षणानिमित्त अनेक भारतीय परदेशात स्थायिक झाले आहेत. मात्र परदेशात वास्तव्य करत असतानाही भारतीय सण, परंपरा आणि संस्कृती जपण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे अमेरिका, स्वित्झर्लंडसह विविध देशांमध्येही गणेशोत्सव साजरा केला जात आहे. दरम्यान, जलप्रदूषण आणि पर्यावरणाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाकडून पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

त्याला नागरिकांकडूनही चांगला प्रतिसाद मिळत असून वाशीतील सद्गुरू आर्टकडील सुमारे ८० टक्के गणेशमूर्ती पर्यावरणपूरक आहेत. यामध्ये प्रामुख्याने शाडू माती तसेच कागदापासून तयार केलेल्या मूर्तींचा समावेश आहे.यंदा सद्गुरू आर्टच्या शाडू मातीच्या मूर्तींना परदेशातूनही मागणी आली. त्यानुसार सात ते आठ गणेशमूर्ती फ्लोरिडा, अमेरिका आणि स्वित्झर्लंड येथे पाठविण्यात आल्या आहेत. या मूर्ती सुखरूप पोहोचल्यानंतर तेथील गणेशभक्तांनी समाधान व्यक्त केले. परदेशात राहूनही पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याकडे भारतीयांचा कल वाढत असल्याचे यावरून दिसून येत आहे.

गणेशमूर्ती तयार करण्यासाठी सध्या कारागिरांची लगबग सुरू आहे. मूर्तींवर अखेरचा हात फिरवणे, रंगकाम, सजावटीची कामे वेगाने सुरू आहेत. मुंबई, नवी मुंबई आणि कोकण परिसरातून दरवर्षी परदेशातील गणेशभक्तांसाठी मूर्ती पाठविल्या जातात. त्यामुळे स्थानिक मूर्तिकारांच्या कलेला आता आंतरराष्ट्रीय स्तरावरही मागणी मिळत असल्याचे चित्र आहे.

# रायगडात पारंपरिक दहीहंडी उत्सव | महिला गोविंदा पथकांचाही सहभाग

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धनच्या ऐतिहासिक आणि पेशवेकालीन वैभवाची साक्ष देणाऱ्या श्री लक्ष्मीनारायण मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सवाचा सोहळा भक्ती, परंपरा आणि उत्साहाच्या त्रिवेणी संगमात रंगला आहे. श्री लक्ष्मीनारायण देवस्थान ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या तीन दिवसीय जन्मोत्सव सोहळ्यात शनिवार (दि. ५ सप्टेंबर) रोजी काल्याचे कीर्तन आणि पुरुषांचे पारंपरिक खेळ भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरले.

या जन्मोत्सव सोहळ्यासाठी नागपूर येथील ह.भ.प. मृण्मयी कुलकर्णी यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे



आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाच्या पहिल्या दिवशी शुक्रवारी रात्री १० वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव आणि जन्मकीर्तन मोठ्या भक्तिभावात पार पडले. श्रीकृष्ण जन्माची मंगलघोषणा होताच मंदिर परिसर 'गोविंदा... गोपाळा...'च्या जयघोषाने दुमदुमून गेला. यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जन्मोत्सवाचा आनंद लुटला.

शनिवारी सकाळी ११ वाजता काल्याच्या कीर्तनाला सुरुवात झाली. कीर्तनातून श्रीकृष्णाच्या बाललीला, गोकुळातील आनंदोत्सव आणि भक्तीचे महत्त्व यांचे रसाळ वर्णन करण्यात आले. कीर्तनाच्या माध्यमातून भक्तिरसात चिंब झालेल्या भाविकांना त्यानंतर मंदिर परिसरात रंगलेल्या पारंपरिक खेळांनी अक्षरशः मंत्रमुग्ध केले.

संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज आणि संत जनाबाई यांच्या अभंगांच्या तालावर पेटी, नाल आणि टाळांच्या गजरात पुरुषांचे पारंपरिक खेळ रंगले. हमामा, हुंबरी, दळण–कांडण, फुगडी, दंड, बस फुगडी आदी खेळ पुरुषवर्गाने उत्स्फूर्तपणे सादर केले. अंगात जोश, चेहऱ्यावर भक्तिभाव आणि अभंगांच्या तालावर पडणारी पावले, अशा उत्साही वातावरणामुळे मंदिर परिसराला जणू पारंपरिक संस्कृतीच्या उत्सवाचे रूप आले होते.

विशेष म्हणजे, काळाच्या ओघात लोप पावत चाललेल्या या पारंपरिक खेळांचे दर्शन नव्या पिढीला घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या उत्सवाच्या माध्यमातून होत आहे. भक्ती आणि मनोरंजनासोबतच आपल्या संतपरंपरेचा आणि लोकसंस्कृतीचा वारसा जपण्याचा सुंदर संदेश या सोहळ्यातून देण्यात आला.

**नागोठणे : बातमीदार**

दहीहंडी उत्सवाच्या ठिकाणी मोठ्या संख्येने नागरिक व युवकांची उपस्थिती लक्षात घेऊन नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि रविंद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिकारी, अंमलदार व होमगार्ड यांनी नागोठणे पोलिस स्टेशनच्या वतीने अंमली पदार्थांच्या सेवन व गैरवापराबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

यावेळी दहीहंडी उत्सवाच्या ठिकाणी 'अंमली पदार्थांपासून दूर राहा' तसेच अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांची माहिती देणारे जनजागृतीपर फ्लेक्स व बॅनर लावण्यात आले होते. या माध्यमातून विशेषतः युवकांना अंमली पदार्थांच्या आहारी न जाता निरोगी व व्यसनमुक्त जीवन जगण्याचे आवाहन करण्यात आले.

अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम याबाबत नागरिकांना माहिती देण्यात आली. दहीहंडीच्या



उत्सवी वातावरणात पोलिसांनी राबविलेल्या या जनजागृती उपक्रमातून 'उत्सव साजरा करा, मात्र नशेपासून दूर राहा' असा सामाजिक संदेश देण्यात आला.

या उपक्रमाला नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, युवकांमध्ये अंमली पदार्थांविरोधात जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज व्यक्त करण्यात आली.




**पेण : प्रतिनिधी**

दरवर्षीपमाणे यंदाही ललित पाटील मित्र मंडळाच्या वतीने भव्य दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पेणसह खालापूर, रोहा आणि अलिबाग तालुक्यातील सुमारे दहा पुरुष आणि दोन महिला गोविंदा पथकांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. ढोल–ताशांचा गजर, गोविंदांचा उत्साह आणि थरावर थर रचत हंडी फोडण्यासाठी सुरू असलेली चुरस यामुळे परिसरात दहीहंडीचा उत्साह शिगेला पोहोचला होता. आठ थरांची रचना करत विठाबाई खारपाले गोविंदा पथकाने मानाची हंडी फोडण्याचा मान पटकावला. विजेत्या पथकाला १ लाख ११ हजार १११ रुपयांचे रोख रक्कम व आकर्षक पारितोषिक देऊन गौरविण्यात आले स्पर्धेत सहभागी झालेल्या महिला गोविंदा पथकांनीही आपल्या दमदार कामगिरीने उपस्थितांची दाद मिळवली.

याप्रसंगी रुद्रावतार महिला गोविंदा पथक, म्हैसबाड यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या पथकाला आकर्षक ट्रॉफी आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. महिला गोविंदांनीही पुरुष गोविंदा पथकांप्रमाणेच उत्साहाने आणि आत्मविश्वासाने सहभाग घेतल्याने स्पर्धेला वेगळे आकर्षण प्राप्त झाले.सहा थरांची सलामी देणाऱ्या गोविंदा पथकांसाठीही आयोजकांच्या वतीने विशेष रोख पारितोषिकाची व्यवस्था करण्यात आली होती.

या दहीहंडी सोहळ्याला पेणच्या नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासोबत व्यासपीठावर सभापती स्मिता पेणकर, आफ्रिन आखवारे,सभापती आनंद जाधव, सुनीता जोशी तसेच नगरसेविका जास्मिन पाटील, नगरसेविका पल्लवी कालेकर, माजी नगरसेवक देवता साकोस्कर, पंचायत समिती सदस्य विवेक म्हात्रे, प्रदिप म्हात्रे, भाजप शहर अध्यक्ष रविंद्र म्हात्रे, युवा मोर्चा अध्यक्ष तथा नगरसेवक मितेश शहा उपस्थित होते. या स्पर्धेला आमदार रविशेठ पाटील यांनी देखील हजेरी लावली.

दहीहंडी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ललित पाटील मित्र मंडळाचे अध्यक्ष ललित पाटील, नगरसेवक अजय क्षिरसागर, नगरसेवक अभिराज कडू, राकेश म्हात्रे, अजित पाटील, संजय पाटील, रोहन सोनावणे आणि माजी नगरसेवक संतोष पाटील, साकिब मुजावर, हितेश पाटील, पार्थ शहा यांच्यासह मंडळातील सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा येथील दहीहंडी उत्सवाला एक आगळीवेगळी पारंपरिक ओळख आहे. अनेक वर्षांपासून जपली जाणारी ही प्रथा आजही तितक्याच श्रद्धेने आणि उत्साहाने साजरी केली जाते. दहीहंडी फोडण्यापूर्वी गोविंदाच्या अंगावर आसूडाचे (सोरट) फटके घेण्याची पारंपरिक प्रथा येथे पाहायला मिळते.

उत्सवादरम्यान कान्होबाची 'वारी' गोविंदाच्या अंगात येते, अशी स्थानिक ग्रामस्थांची श्रद्धा आहे. या पारंपरिक विधीनंतर गोविंदा उत्साहात नृत्य करू लागतात. महिलांकडून त्यांची पूजा–अर्चा केली जाते. त्यानंतर गोविंदा पारंपरिक पद्धतीने गावातून फिरतात आणि हा सोहळा पार पडल्यानंतर दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम होतो.

ही प्रथा नेमकी कधीपासून सुरू झाली, याबाबत निश्चित माहिती उपलब्ध नसली तरी पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली ही लोकपरंपरा ग्रामस्थांनी आजही जपली आहे. बदलत्या काळात अनेक पारंपरिक प्रथा मागे पडत असताना, जांभूळपाड्यातील ही परंपरा आजही श्रद्धा, लोकविश्वास आणि सामूहिक सहभागातून जिवंत असल्याचे दिसून आले.या अनोख्या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

सुधागड तालुक्यातील गावागावांतही गोपाळकाल्याचा उत्साह मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाला. लहान–मोठ्या दहीहंड्या फोडताना बालगोपालांसह तरुणाईने नृत्याचा ठेका धरला. पारंपरिक गाणी म्हणत गोविंदा घरोघरी जात होते. ठिकठिकाणी दहीकाला, फळे आदी प्रसाद देऊन तसेच पाण्याचा वर्षाव करत गोविंदांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

श्रद्धा, परंपरा, लोकसंस्कृती आणि उत्साह यांचा सुरेख संगम असलेल्या जांभूळपाड्यातील दहीहंडी उत्सवाने कोकणच्या समृद्ध लोकपरंपरेचे पुन्हा एकदा दर्शन घडविले. काळ बदलला, उत्सव साजरा करण्याच्या पद्धतींमध्ये बदल झाले; मात्र जांभूळपाड्यातील ही आगळीवेगळी प्रथा आणि परंपरा आजही ग्रामस्थांच्या श्रद्धेतून आणि उत्साहातून तितक्याच जिवंतपणे जपली जात आहे.



**नागोठणे : बातमीदार**

भाजप दक्षिण रायगड जिल्हा महामंत्री तथा रायगड जिल्हा परिषद कृषी व दुग्ध विकास सभापती आणि गटनेते वैकुंठदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वैकुंठदादा पाटील मित्रमंडळाच्या वतीने नागोठणे एसटी स्टॅण्ड परिसरात भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. ढोल–ताशांच्या गजरात, श्रावण सरींची बरसात आणि उत्साहपूर्ण वातावरणात हा दहीहंडी उत्सव मोठ्या जल्लोषात पार पडला.

या दहीहंडी उत्सवाला रायगड जिल्हा परिषदेचे कृषी व दुग्ध विकास सभापती वैकुंठ पाटील, भाजप महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस शर्मिला पाटील, भाजप महिला मोर्चा प्रदेश सचिव श्रेया कुंटे, ज्येष्ठ नेते किशोर, मारुती देवरे, महादेव मोहिते, अनंत वाघ, गणपतशेठ म्हात्रे, नागोठणे मंडळ अध्यक्ष महेश ठाकूर, तालुका महामंत्री एकनाथ ठाकूर, आनंद लाड, शिक्षण सेल तालुका अध्यक्ष अशोक अहिरे, सिराज पानसरे, राजू लवटे, संतोष लाड, अंकुश सुटे, शेखर गोळे, रऊफ कडवेकर, गणेश घाग, प्रमोद नागोठणेकर, तिरत पोलसानी, विठोबा माळी, आदित्य सुटे, अपर्णा सुटे, मुग्धा गडकरी, शीतल नांगरे, वर्षी जांबेकर आदी भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने गोविंदा प्रेमी व प्रेक्षक उपस्थित होते.



या दहीहंडी स्पर्धेसाठी १ लाख ११ हजार १११ रुपयांचे प्रथम पारितोषिक ठेवण्यात आले होते. तसेच ६ थरांच्या पुरुष सलामीसाठी ६ हजार रुपये आणि ४ थरांच्या महिला सलामीसाठी ४ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण २६ गोविंदा पथकांनी सहभाग घेतला.७ थरांचा मानोरा रचत बापदेव गोविंदा पथक, वणी आणि जय हनुमान गोविंदा पथक, आमडोशी या दोन्ही पथकांनी १ लाख ११ हजार १११ रुपयांचे बक्षीस विभागून घेतले. हंडी व ट्रॉफी कोणत्या पथकाला मिळणार यासाठी चिठ्ठी काढण्यात आली. यामध्ये बापदेव गोविंदा पथक, वणी यांनी बाजी मारली.

तर ६ थरांचा मानोरा रचून सलामीचे ६ हजार रुपयांचे बक्षीस विठाबाई गोविंदा पथक खारपाले, रुद्र अवतार गोविंदा पथक म्हैसबाड–खारपाले, बापदेव गोविंदा पथक पांडापूर, मरीआई गोविंदा पथक वांगणी, नवतरुण गोविंदा पथक गोफण, गावदेवी गोविंदा पथक कुहिरे, आई कोसबाई गोविंदा पथक निडी, ज्ञानेश्वर गोविंदा पथक गडब, जय हनुमान गोविंदा पथक कोलेटी, जाखमता गोविंदा पथक वेलशेत, जय हनुमान गोविंदा पथक आमडोशी आणि चौंडेश्वरी गोविंदा पथक वरवठणे या पथकांनी मिळविले.



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. लहानगा गोविंदापासून ते वयोवृद्ध पर्यंत दहीहंडी निमित्ताने ठेका धरताना दिसले.वरुणराजाच्या हजेरीने गोविंदांना उत्सहा देऊन गेला

सर्वत्र दही हंडीची स्पर्धा चालू असताना रोहेकरांनी आज ही पारंपारिक पद्धतीने दहीहंडी उत्सव साजरा केला असून तालुक्यातील ग्रामीण भागातही दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातही दहीहंडी उत्सवाची शनिवारी धूम दिसून आली.रोहा शहरात आजही गावपण जपत प्रत्येक आळीने शिस्तबद्ध खेळ करीत पारंपारिक दहीहंडी उत्सव जपल्याचे शनीवारपहायला मिळाले.नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी ही गोविंदा पथकात ठेका धरला.

दुपारपासून सुरू झालेल्या दहीहंडी उत्सवात शहरातील ठिक ठिकाणी गोविंदा पथकाचे थरार पहावयास मिळाले. यामध्ये महिला गोविंदा पथकांचाही सहभाग होता.रोहा तालुक्यातील ग्रामीण भागात मेढा, नागोठणे, खांब, कोलाड, सुतारवाडी, धाटाव, भालगाव, घोसाळे, चणेरा, यशवंतखार विभागात दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला.शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात गोविंदांनी विविध रंगांचे टी–शर्ट घातले होते.

गोकुळाष्टमी नंतर रोहा शहरातील पारंपरिक गोविंदा पथक मोरे आळी, अंधार आळी, धनगर आळी, संत गोरोबानगर दमखाडी, ब्राम्हण आळी सह अन्य शहरांतील आळीने शिस्तबद्ध रित्या रोहा शहरातील हंड्या फोडल्या. बाल गोपाळापासुन ते वयस्कर गोविंदात ठेका धरताना दिसले.

रोहा शहरात स्फुर्ती प्रतिष्ठान,सावरकर मित्र मंडळ राम मारुती चौक,ट्विंकल फ्रेंड्स ग्रुप, माजी नगराध्यक्ष समिर शेडगे पुरस्कृत, माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह व व्यापारी पुरस्कृत, भाजप पक्षाने मुख्य बाजारपेठे दही हंडी बांधली होती.यावेळी मोठ्या प्रमाणात रोहे कर नागरिक उपस्थित होते.

**पाली : प्रतिनिधी**

पाली शहरात यंदाची भारतीय जनता पार्टीची दहीहंडी केवळ उत्सव राहिली नाही, तर ती ठरली थरार, संस्कृती आणि भव्यतेचा संगम! हजारो नागरिकांची उपस्थिती, ढोल–ताशांचा गजर, आकर्षक विद्युत रोषणाई, भव्य सांस्कृतिक कार्यक्रम आणि हंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांनी लावलेले उंचच उंच थर..या सगळ्यामुळे पालीचा परिसर अक्षरशःजल्लोषात न्हाऊन निघाला.

प्रकाश देसाई यांच्या संकल्पनेतून व भाजप पुरस्कृत आयोजित करण्यात आलेल्या या भव्य दहीहंडी सोहळ्याने सुधागडच्या सांस्कृतिक क्षेत्राला नवी ओळख मिळवून दिली. विशेष म्हणजे विजेत्या गोविंदा पथकासाठी तब्बल ३ लाख ३३ हजार ३३३ रुपयांचे आकर्षक पारितोषिक ठेवण्यात आले होते.

या भाजपच्या दहीहंडी उत्सव २०२६वर जोगेश्वरी नागोठणे गोविंदा पथकाने नाव कोरले, तर सुधागड तालुका मर्यादित चषकावर कुंभारआळी गोविंदा पथकाने यशस्वी सात थर लावून १ लाख ११ हजार १११ चे बक्षीस पटकावले. पाच आणि सहा थराची



सलामी देणाऱ्या प्रत्येक गोविंदा पथकाला १० हजार रोख व आकर्षक चषक देऊन गौरविले. यावेळी ओम साई अँकेडमी च्या कलाकारांनी उत्कृष्ट कला सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

पाली शहरात भाजपच्य वतीने भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाला सुधागड तालुक्यासह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. या कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते प्रकाश देसाई, जिल्हा परिषद सभापती वैकुंठ पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा नीलिमा पाटील, भाजप नेत्या गिता पालरेचा, रवींद्र देशमुख, आलाप मेहता,अॅड सुभाष पाटील, विठ्ठल सिंदकर, दादा घोसाळकर, तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, पंचायत समिती सभापती जागृती मानकर, उपसभापती संदेश शेवाळे, नगराध्यक्ष पराग मेहता, माजी नगराध्यक्ष अरिफ मनियार, भाजप ठाणे जिल्हा उपाध्यक्ष रमेश सागळे, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष प्रणाली शेठ,रोहन दगडे, सुशील शिंदे, सुजित बारसकर उपस्थित होते. या उत्सवाला शिवसेना युवा जिल्हा प्रमुख संजय म्हात्रे, अनुपम कुलकर्णी, राजेंद्र राऊत, सूरज शेळके, संदीप दपके, मनोज भोईर,ओमकार खोडागळे, सुबोध पालांडे आदींनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

# भारताने घेतली पाकिस्तानची फिरकी!

## महिला आशिया चषकात दणदणीत विजय

**दुबई : वृत्तसंस्था**

महिला आशिया कप स्पर्धेतील दुबईच्या मैदानात रंगलेल्या साखळी फेरीतील तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात भारतीय फिरकी गोलंदाजांनी पाकिस्तानी बॅटर्सची फिरकी घेतली. त्यानंतर अल्प धावसंख्येचा पाठलाग करताना भारताची कर्णधार हरमनप्रीत कौरने षटकार खेचत सात विकेट्स राखून टीम इंडियाचा विजय निश्चित केला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेल्या पाकिस्तानचा संघ या सामन्यात अवघ्या ५५ धावांवर आटोपला. भारताने ५२ चेंडूत हे आव्हान पार करत आशिया कप स्पर्धेतील सलग तिसऱ्या विजयाची नोंद करत पाकिस्तानविरुद्धचा आपला दबदबा कायम ठेवला.



पाकिस्तानच्या संघाने दिलेल्या अल्प धावसंख्येचा पाठलाग करताना शफाली वर्माने षटकार ठोकत टीम इंडिया आणि आपले खाते उघडले, मात्र १२ धावांवर तिला आपली विकेट गमवावी लागली. तिची जागा घेण्यासाठी मैदानात उतरलेली प्रतिका रावल सलग तिसऱ्या सामन्यात आपल्या फलंदाजीतील धमक दाखवण्यात अपयशी ठरली. एका चौकारासह तीन चेंडूत तिचा डाव संपुष्टात आला. हाँगकाँगविरुद्ध विक्रमी शतक झळकवणाऱ्या स्मृती मानधनालाही दुहेरी आकडा गाठता आला नाही. ती नऊ धावांवर माघारी परतली. भारताच्या या तिन्ही विकेट्स पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना हिने घेतल्या, मात्र त्यानंतर हरमनप्रीत कौर आणि दीप्ती शर्माने डावाची सूत्रे हाती घेतली. दोघींनी मिळून टीम इंडियाला विजयाच्या उंबरठ्यावर नेले आणि नवव्या षटकातील चौथ्या चेंडूवर हरमनप्रीतने षटकार ठोकत भारताचा विजय निश्चित केला.

तत्पूर्वी पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना हिने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजीचा निर्णय घेतला होता. विकेट किपर बॅटर मुनीबा अली आणि शवाल जुल्फिकार या दोघींनी संघाला सावध सुरुवात करून दिली. डावाच्या तिसऱ्याच षटकात प्रतिका रावलने मुनीबाचा एक सोपा झेल सुटला. त्यानंतर पाचव्या षटकात शफाली वर्माने कर्णधाराचा विश्वास सार्थ ठरवत मुनीबाला १३ (१४) बोल्ड करत भारतीय संघाला पहिले यश मिळवून दिले. मग श्री चरणी पिक्चरमध्ये आली. पॉवर प्लेमध्ये तीन विकेट्सच्या मोबदल्यात २९ धावा करणारा पाकिस्तानचा संघ १८.१ षटकात ५५ धावांवर आटोपला. आंतरराष्ट्रीय टी-२०मधील ही त्यांची नीचांकी धावसंख्या ठरली. टीम इंडियाकडून श्री चरणी आणि प्रेमा रावत यांनी प्रत्येकी तीन, दीप्तीने दोन आणि शफालीने एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.

# चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत सात्त्विक-चिरागला विजेतेपद

**बीजिंग : वृत्तसंस्था**

भारतीय बॅडमिंटन जगतातील स्टार जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी पुन्हा एकदा जागतिक स्तरावर भारताची मान अभिमानाने उंच केली आहे. अत्यंत अटीतटीच्या ठरलेल्या अंतिम सामन्यात चिनी जोडीचा पराभव करत सात्विक आणि चिरागने पहिल्यांदाच प्रतिष्ठित चायना मास्टर्स २०२६ स्पर्धेच्या जेतेपदावर आपले नाव कोरले.

शेनझेन येथे खेळल्या गेलेल्या पुरुष दुहेरीच्या या अत्यंत चुरशीच्या आणि थरारक अंतिम सामन्यात भारतीय जोडीने अप्रतिम पुनरागमन केले. त्यांनी चीनच्या हे जिटिंग आणि रेन शियांगयू या तगड्या जोडीचा पराभव केला.



यंदा सात्त्विक आणि चिरागने मलेशियाच्या नूर मोहम्मद अझरिन अयुब आणि टॅन वी किओंग या जोडीचा २१-१५, १८-२१, २१-११ असा पराभव करून दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला होता. या स्पर्धेतील सात्त्विक-चिरागची ही एकूण तिसरी अंतिम फेरी होती. यापूर्वी २०२३ आणि २०२५मध्येही त्यांनी अंतिम फेरी गाठली होती. तिसऱ्यांदा फायनलमध्ये पोहचल्यावर त्यांनी अखेर हा उपविजेतेपदाचा शाप संपवला आणि ट्रॉफी उंचावली. या ऐतिहासिक विजयासह त्यांनी आपल्या कारकिर्दीतील १० वे 'बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर' विजेतेपदही निश्चित केले.

# शफाली वर्माचे एकात डावात दोन विश्वविक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला टी-२० आशिया कप स्पर्धेत भारताची युवा स्फोटक बॅटर आणि लेडी सेहवाग नावाने ओळखली जाणाऱ्या शफाली वर्माने एका डावात दोन विश्वविक्रमांना गवसणी घालत नवा इतिहास रचला आहे.



पाकिस्तानविरुद्धच्या हायव्होल्टेज लढतीत शफालीने अवघ्या २२ वर्षे २२० दिवसांच्या वयात टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तीन हजार धावांचा टप्पा गाठला. सर्वात जलद आणि कमी वयात हा टप्पा गाठण्याचा विश्वविक्रम तिने आपल्या नावे नोंदवला. याआधी सर्वात कमी वयात इतक्या धावा पूर्ण करण्याचा विक्रम आयर्लंडच्या गॅबी लुईसच्या नावावर होता. तिने २४ वर्षे ३४७ दिवसांच्या वयात तीन हजार टी-२० आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण केल्या होत्या.

शफालीने फक्त २,१८२ चेंडूंचा सामना करत तीन हजार धावांचा टप्पा गाठला. यासह तिने ॲलिसा हिलीचाही विक्रम मोडला. हिलीने २,३२१ चेंडूंचा सामना करत हा टप्पा गाठला होता. त्यामुळे शफाली चेंडूंच्या संख्येच्या बाबतीत तीन हजार टी-२० आंतरराष्ट्रीय धावा करणारी सर्वात जलदगतीने करणारी महिला क्रिकेटपटू ठरली आहे.

शफालीने आपल्या ११३व्या डावात तीन हजार धावा पूर्ण केल्या. याबाबतीत तिने स्मृती मानधनाचा १२२ डावांचा आणि हरमनप्रीत कौरचा १३५ डावांचा विक्रम मागे टाकला. याबाबतीत ऑस्ट्रेलियाची बेथ मूनी १०० डावांसह जगात अव्वल आहे.

भारतासमोर पाकिस्तानने केवळ ५६ धावांचे लक्ष्य ठेवले होते. लक्ष्याचा पाठलाग करताना शफालीने पहिल्याच चेंडूवर लॉन्ग ऑफच्या दिशेने षटकार ठोकला. त्यानंतर पुढच्या चेंडूवर एक धाव घेत तिने तीन हजार धावांचा ऐतिहासिक टप्पा गाठला.

विशेष म्हणजे टी-२०मध्ये तिने दुसऱ्यांदा षटकारासह खाते उघडले. हादेखील एक विक्रम आहे. कमालीचा योगायोग म्हणजे याआधी पाकिस्तानविरुद्ध तिने सादिया इक्बालच्या गोलंदाजीवरच हा डाव साधला होता.

# 'पीसीबी'कडून खेळाडूंचे मोबाईल फोन जप्त

**लंडन : वृत्तसंस्था**

सध्या इंग्लंडच्या दौऱ्यावर गेलेल्या पाकिस्तानच्या क्रिकेट संघासाठी हा दौरा अत्यंत निराशाजनक ठरत आहे. पहिल्या दोन कसोटीत पराभव झाला असतानात संघातील अंतर्गत घडामोडींमुळेही पाकिस्तानचा संघ अडचणीत सापडला आहे. यादरम्यान, इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटीपूर्वी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने संघातील काही खेळाडूंचे मोबाईल फोन जप्त करून आपल्या ताब्यात घेतले आहेत. हे फोन तिसरी कसोटी संपेपर्यंत पीसीबीकडेच राहतील.

पीसीबीने घेतलेल्या या निर्मयामुळे क्रिकेट जगतात खळबळ उडाली आहे, मात्र पीसीबीने कोणत्या क्रिकेटपटूंचे फोन ताब्यात घेतले आहेत आणि असे कठोर पाऊल का उचलले याबाबत आतापर्यंत कुठलीही अधिकृत माहिती समोर येऊ शकलेली नाही.



पाकिस्तान क्रिकेट संघटनेने केलेल्या या कारवाईमुळे खेळाडूंच्या खासगीपणाबाबत मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. कुठल्याही खेळाडूचा फोन किती वेळ आपल्याकडे ठेवला जाऊ शकतो तसेच कोणत्या परिस्थितीत त्यात असलेल्या खासगी माहितीपर्यंत पोहचता येऊ शकते, याबाबत माहिती मिळणे आवश्यक आहे.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खेळाडूंकडून होणाऱ्या मोबाईल फोनच्या वापराबाबत आयसीसीने अत्यंत कठोर निर्बंध घातलेले आहेत. सामन्यादरम्यान, ड्रेसिंग रूमसह प्रतिबंधित क्षेत्रात खेळाडू आणि सपोर्ट स्टाफला मोबाईल फोन किंवा संपर्क साधू शकता येणाऱ्या कुठल्याही अन्य डिव्हाईसचा वापर करता येत नाही.

### कारण गुलदस्त्यात

याबाबत ३६५ न्यूज या पाकिस्तानी वृत्तवाहिनीने दिलेल्या माहितीनुसार संघातील खेळाडूंचे मोबाईल फोन हे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या ताब्यात देण्यात आले आहेत, मात्र हे फोन टीम प्रोटोकॉल, शिस्तपालनाची प्रक्रिया किंवा कुठल्या अन्य कारणाने ताब्यात घेतले आहेत का? याबाबत पीसीबीकडून कुठलीही माहिती देण्यात आलेली नाही. एवढ्या तातडीने करण्यात आलेल्या कारवाईमुळे पीसीबीला मॅच फिक्सिंगबाबत काही चिंता आहे का? असा प्रश्न क्रिकेटप्रेमींना पडला आहे. यावरून आत तर्कवितर्क लावले जात आहेत.

## भारताच्या विजयानंतर इरफानची पोस्ट चर्चेत

**मुंबई** : महिला आशिया चषक स्पर्धेत भारतीय महिला क्रिकेट संघाने आपली घोडदौड कायम ठेवत पारंपारिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा सात गडी राखून धुव्वा उडवला. या दिमाखदार विजयानंतर भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू इरफान पठाणने सोशल मीडियावर केलेली एक पोस्ट व्हायरल होत आहे.

भारताच्या दणदणीत विजयानंतर इरफान पठाणने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पाकिस्तानची खोड काढत एक मिश्कील पोस्ट केली. त्याने लिहिले, "आज संडे आहे का?" इरफानच्या या एका वाक्याने क्रिकेट चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले. यापूर्वी २०२५च्या पुरुष आशिया चषक स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान संघ सलग तीन रविवारी आमनेसामने आले होते. त्यावेळी सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने पाकिस्तानचा पराभव केल्यावर इरफानने "रविवार कसा राहिला, शेजाऱ्यांनो?" अशी पोस्ट केली होती. आता महिला संघाच्या विजयानंतर त्याने पुन्हा एकदा हा संदर्भ दिला आहे.

# हरमनप्रीत कौरचा विश्वविक्रम

## कर्णधार म्हणून १५०व्या सामन्यात केले नेतृत्व

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिलांच्या टी-२० आशिया चषक स्पर्धेत रविवारी भारत आणि पाकिस्तान संघांमध्ये सामना खेळवला गेला. यादरम्यान भारताची कर्णधार हरमनप्रीत कौरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये इतिहास घडवत विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे.

भारत-पाकिस्तान सामना हा कर्णधार म्हणून हरमनप्रीत कौरचा ऐतिहासिक १५०वा सामना होता. कर्णधार म्हणून सर्वाधिक सामन्यांमध्ये संघाचे नेतृत्व करणारी हरमनप्रीत ही जगातील पहिली कर्णधार ठरली आहे. फक्त महिला क्रिकेट नव्हे तर पुरुषांच्या क्रिकेटमध्येही सर्वाधिक १५० सामन्यांमध्ये कर्णधारपद भूषवणारी ती पहिली खेळाडू आहे.



भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने २०१२मध्ये सर्वप्रथम टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व स्वीकारले आणि तेव्हापासून ती ही जबाबदारी अत्यंत प्रभावीपणे पार पाडत आहे. पाकिस्तानविरुद्धच्या महिला टी-२० आशिया चषक सामन्यात नाणेफेकीसाठी मैदानात उतरताच तिने इतिहास घडवला.


पुरुष आणि महिला अशा दोन्ही प्रकारच्या क्रिकेटमध्ये १५० टी-२० सामन्यांत संघाचे नेतृत्व करणारी हरमनप्रीत जगातील पहिलीच खेळाडू ठरली. तिच्या नेतृत्वाखाली भारताने आतापर्यंत खेळलेल्या १४९ टी-२० सामन्यांपैकी ८७ सामने जिंकले आहेत आणि ५७ सामने गमावले आहेत, तर पाच सामने अनिर्णित राहिले आहेत.

# भारत-जपान विशेष क्रिकेट सामना रंगणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेतील आपल्या मोहिमेला सुरुवात करण्यापूर्वी भारतीय पुरुष क्रिकेट संघ जपानविरुद्ध एक ऐतिहासिक टी-२० सामना खेळणार आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताचा पहिला सामना २८ सप्टेंबर रोजी होणार असून जपानविरुद्धचा हा सामना त्यापूर्वी अवघ्या सहा दिवसांनी म्हणजेच २२ सप्टेंबर रोजी खेळला जाईल. पुरुष क्रिकेटच्या इतिहासात भारतीय आणि जपानी संघ आमनेसामने येण्याची ही पहिलीच वेळ असेल.

बीसीसीआयने आपल्या अधिकृत एक्स हँडलवर जाहीर केले की, भारत आणि जपान यांच्यातील संबंधांच्या ७५व्या वर्धापन दिनानिमित्त या ऐतिहासिक टी-२० सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सामना २२ सप्टेंबर रोजी जपानमधील तोचिगी प्रांतातील सानो आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर खेळला जाईल. सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ९.३० वाजता सुरू होईल.



या संदर्भात बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी सांगितले की, म्हणाले की, हा टी-२० सामना खेळण्यासाठी जपानला जाणे ही भारतीय क्रिकेट संघासाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. जपान आणि उर्वरित पूर्व आशियामध्ये क्रिकेटला लोकप्रिय करण्यासाठी हा सामना एक उत्तम संधी आहे. भारत आणि जपान यांच्यातील मैत्री खूप जुनी आणि घट्ट आहे, आणि खेळाच्या माध्यमातून या ७५ वर्षांच्या संबंधांचा उत्सव साजरा करणे हा एक खरोखरच विशेष अनुभव असेल.

# विल्यम्स भगिनींची झुंज अपयशी

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

टेनिसविश्वातील वलयांकित सेरेना आणि व्हीनस विल्यम्स भगिनी चार वर्षांच्या कालावधीनंतर एकत्रित खेळण्यास कोर्टवर उतरल्या. त्यांनी झुंजही दिली, मात्र अखेरीस त्यांच्या पदरी निराशाच पडली. मायदेशातील अमेरिकन खुल्या ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या महिला दुहेरीतील पहिल्याच फेरीत विल्यम्स भगिनींना १४व्या मानांकित चॅन हाओ-चिंग आणि माया जॉइंट यांच्या जोडीकडून ६-३, ६-७ (६-८), ६-७ (७-१०) असा पराभव पत्करावा लागला.



निर्णायक 'टायब्रेक'मध्ये विल्यम्स भगिनींनी ५-० अशी आघाडी घेतली होती. विजयापासून त्या अवघ्या पाच गुणांवर होत्या. आर्थर ॲश स्टेडियम चाहत्यांच्या जल्लोषाने दणाणून गेले होते आणि सामना त्यांच्या बाजूने झुकल्याचे चित्र होते, मात्र चॅन आणि माया यांनी हार मानली नाही. त्यांनी अखेरचे १२पैकी १० गुण मिळवत सामन्यात बाजी मारली आणि दुसरी फेरी गाठली.

निवृत्ती मागे घेत याच वर्षी व्यावसायिक टेनिसमध्ये परतलेल्या ४४ वर्षीय सेरेना आणि ४६ वर्षीय व्हीनसने पहिला सेट जिंकत सामन्यात आघाडी घेतली. दुसरा सेट 'टायब्रेकर'मध्ये गमावल्यानंतर तिसऱ्या सेटमध्ये त्यांनी पिछाडीवरून पुनरागमन केले, मात्र 'टायब्रेकर'मधील चुकांचा त्यांना फटका बसला.

### स्थानिकांचा पाठिंबा

स्टेडियममधील २० हजारांहून अधिक प्रेक्षकांनी आपल्या लाडक्या अमेरिकन खेळाडूंना प्रचंड उत्साहाने पाठिंबा दिला. ग्रँडस्लॅम स्पर्धेत महिला दुहेरीतील पहिल्याच फेरीच्या सामन्याला रात्रीच्या सत्राचे प्रमुख आकर्षण (मेन इव्हेंट) मिळणे ही दुर्मीळ बाब. सेरेना आणि व्हीनस २०२२नंतर प्रथमच ग्रँडस्लॅम स्पर्धेत एकत्र खेळल्या. त्यामुळे हा सामना विशेष आकर्षणाचा ठरला.

# स्लेजिंगच्या जाळ्यात अडकला वैभव सूर्यवंशी

**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नईच्या एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर सुरू असलेल्या दुलीप ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात पूर्व विभागाचा १५ वर्षीय युवा उपकर्णधार वैभव सूर्यवंशी याने आपल्या फटकेबाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले, मात्र डावाच्या सुरुवातीलाच आक्रमक पवित्र्यात दिसलेला वैभव अवघ्या ४४ धावांवर आपली विकेट गमावून बसला.

नाणेफेक जिंकून पूर्व विभागाचा कर्णधार इशान किशनने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. डावाची सुरुवात करताना वैभव सूर्यवंशी आणि अभिमन्यू ईश्वरन यांनी दक्षिण विभागाच्या गोलंदाजांवर सुरुवातीपासूनच हल्ला चढवला. वैभवने भारतीय संघाचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजच्या एकाच षटकात दोन चौकार आणि एक षटकार ठोकत त्याला बॅकफूटवर ढकलले.

धावांची गती रोखण्यासाठी दक्षिण विभागाचा कर्णधार तिलक वर्माने स्वतः रणनीती आखली. स्टंप माईकमध्ये तिलकचे शब्द स्पष्ट ऐकू आले. तो वैभवला चिडवत म्हणाला, "क्या यार ये व्हाइस कॅप्टन?" अर्थात, दोन्ही खेळाडूंमध्ये हे खेळकर वातावरणात घडले असले, तरी त्याचा परिणाम वैभवच्या एकाग्रतेवर झाला. चाम मिलिंदच्या गोलंदाजीवर मोठा फटका मारण्याच्या नादात वैभव ४४ धावांवर झेलबाद झाला. उपांत्य फेरीतही मध्य विभागाविरुद्ध ९२ धावांवर बाद झाल्याने त्याचे शतक हुकले होते, तर आता त्याचे अर्धशतक सहा धावांनी हुकले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com